सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

पावसाचा खंड पडलेल्या विभागांतील पिकांचे सर्वेक्षण करा!; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश

मुंबई : राज्यातील काही भागांत पावसाने दीर्घ खंड दिल्याने पिके अडचणीत आली असताना, अशा भागांतील नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadnavis) यांनी मंगळवारी दिले. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील ज्या भागांत पावसाची मोठी तूट आहे, तेथे पिकांची स्थिती तपासून आवश्यक ती मदत करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पिके वाचविण्यासाठी दिवसाला १२ तास वीज देण्याबरोबरच जळालेले रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) तातडीने बदलण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस (Devendra Fadnavis) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पीकपाहणी आणि राज्यातील पर्जन्यमानाचा आढावा घेण्यात आला. ज्या ठिकाणी पावसाचा मोठा खंड पडला आहे आणि त्यामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे, त्या भागांचे सर्वेक्षण सुरू करण्याचे आदेश मुख्य सचिवांना देण्यात आल्याचे बावनकुळे यांनी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. राज्यातील काही भागांत पावसाची तूट लक्षणीय आहे. विदर्भात सुमारे ३५ टक्के पाऊस कमी झाला असून, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण कमी आहे. पावसाच्या दीर्घ खंडामुळे अनेक ठिकाणी पिके आणि पाण्याची उपलब्धता अडचणीत आली आहे. त्यामुळे एकीकडे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे, तर दुसरीकडे पिकांना वाचविण्यासाठी आवश्यक ते सिंचन उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पिकांना पाणी देण्यासाठी दिवसाला १२ तास वीज उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्याचबरोबर जळालेले रोहित्र तातडीने बदलून वीजपुरवठा सुरळीत करण्यासही सांगण्यात आले आहे. ज्या भागात पिके वाचविणे शक्य होणार नाही, तेथे सर्वेक्षण आणि पंचनाम्यांच्या आधारे नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही केली जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पुढील आठवड्यात पावसाची शक्यता कमी असल्याच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील परभणी, बीड, हिंगोली आदी जिल्ह्यांसाठी स्वतंत्र पॅकेज किंवा विशेष उपाययोजना करण्यात येणार का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर सध्या सर्वप्रथम पंचनामे करणे महत्त्वाचे असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. पाऊस परतला आणि पावसाची तूट भरून निघाली तर परिस्थिती सुधारेल; अन्यथा सरकारकडून आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचेही वर्षभराचे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील विविध जलसाठ्यांमध्ये किती पाणी उपलब्ध आहे आणि ते पुढील काळात कशा पद्धतीने वापरता येईल, याचे नियोजन करण्याची सूचना बैठकीत करण्यात आली. सध्या उपलब्ध असलेले पाणी आणि जलसाठे जपून वापरणे आवश्यक असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

गणेशोत्सव आणि आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्थेबाबतही बैठकीत सूचना देण्यात आल्या. सण-उत्सव शांततेत पार पडण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. दरम्यान, साखर कारखान्यांचा गाळप हंगाम लवकर सुरू करण्याच्या सरकारच्या निर्णयाला काही कारखानदार आणि शेतकऱ्यांकडून विरोध होत असल्याबाबत विचारले असता, सरकारची भूमिका योग्य असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. गाळप हंगाम लवकर सुरू झाल्यास त्याचा पुढे फायदा होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेतील प्रकार गंभीर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बीकेसीतील कार्यक्रमस्थळी बनावट ओळखपत्रासह दोन जणांना ताब्यात घेतल्याच्या घटनेवरही बावनकुळे यांनी भाष्य केले.

'नेत्रम' ॲपच्या माध्यमातून शिवनेरीतील बांधकामांची तपासणी; अनधिकृत बांधकामांवर सात दिवसांत कारवाई - ॲड. आशिष शेलार

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेल्या शिवनेरी किल्ल्याचे ऐतिहासिक आणि जागतिक वारसा महत्त्व लक्षात घेता, किल्ला परिसरातील अनधिकृत बांधकामे, कबर, दर्गे तसेच इतर संरचनांची तातडीने वस्तुनिष्ठ तपासणी करावी आणि त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले. शिवनेरी किल्ला आणि परिसरातील सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी ॲड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली आज संबंधित अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीला जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे (ASI) अधिकारी, पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, तहसीलदार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी उपस्थित होते. बैठकीत किल्ल्याच्या ऐतिहासिक वारशाचे जतन आणि परिसरातील अनधिकृत संरचनांबाबत पुढील कार्यवाहीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शिवनेरी किल्ला हा जागतिक वारशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, संबंधित वास्तूच्या संरक्षित व बफर झोनमध्ये कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम अथवा संरचना उभारली जाणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना मंत्री ॲड. शेलार यांनी दिल्या. किल्ला परिसरातील कबर, दर्गा तसेच इतर संरचना नेमक्या कोणत्या कालखंडात निर्माण झाल्या, त्याबाबत महसूल अभिलेख, उपलब्ध ऐतिहासिक दस्तऐवज तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वस्तुनिष्ठ अहवाल तयार करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

"मराठा समाजाच्या हितासाठी निर्णय घेणाऱ्यांवरच टीका केली जात असेल, तर ती भूमिका मराठा समाज आता कदापि सहन करणार नाही." - विखे पाटील

शिर्डी (प्रतिनिधी) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळातच मराठा समाजाला न्याय देणारे निर्णय झाले आहेत. आतापर्यंत असे निर्णय कधीही झालेले नव्हते. मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केलेल्या सर्वच मुद्द्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका घेऊन एक पाऊल पुढे टाकले आहे. झालेल्या निर्णयांबाबत त्यांनीही आता समाधान व्यक्त करून सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे. सरकार निर्णय घेत असताना त्यांनीही दोन पावले पुढे टाकावीत, असे आवाहन जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, सरकारने घेतलेल्या निर्णयांप्रमाणे निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांनी आजपासून मराठवाड्यातील दौरे सुरू केले असून, त्यांच्या दौऱ्यातूनही वस्तुस्थिती समोर येईल. यापूर्वी या सर्व नोंदी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली शोधल्या गेल्या होत्या. दाखले देण्यासाठी सरकारने तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेऊन दाखले देण्याच्या प्रक्रियेलाही गती यावी, म्हणून मंडल स्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी लोकांनीही अर्ज केले पाहिजेत. ५८ लाख नोंदी ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये लावण्यात आल्या असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले.

मराठा समाजाला न्याय मिळावा, म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोन नेत्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. यापूर्वी मराठा समाजाच्या हिताचे निर्णय कधीही झाले नव्हते. ज्यांनी निर्णय घेतले, त्यांनाच नावे ठेवली जात असतील किंवा त्यांच्या विरोधात काही विधाने होत असतील, तर मराठा समाजही ते आता खपवून घेणार नाही. सरकार सकारात्मक नसते, तर वेगळी गोष्ट होती; परंतु मनोज जरांगे पाटील यांनी वेळोवेळी उपस्थित केलेल्या सर्वच मुद्द्यांवर सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे. घेतलेल्या सर्व निर्णयांवर त्यांनी समाधान व्यक्त केले पाहिजे. निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत त्यांच्याकडून आम्हाला सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे, असे मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

हजेरी पटावर १९१ शिक्षक; प्रत्यक्ष प्रशिक्षणात केवळ ५६ !

135 शिक्षक गैरहजर; बदललेल्या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणालाच शिक्षकांची दांडी

तभा वृत्तसेवा / सहयोग प्र.जावळे

कन्नड :दि.०८ सप्टेंबर - बदललेल्या अभ्यासक्रमानुसार शिक्षकांना आवश्यक प्रशिक्षण देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या तालुकास्तरीय प्रशिक्षणाच्या दि.०८ पहिल्याच दिवशी शिक्षकांच्या उपस्थितीबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हजेरी पटावर जिल्हा परिषद व खासगी शाळांमधील तब्बल १९१ शिक्षकांची नोंद असताना दुपारच्या सत्रात प्रत्यक्ष केवळ ५६ शिक्षक उपस्थित असल्याचे आढळून आले. त्यामुळे तब्बल १३५ शिक्षक गैरहजर राहिल्याचे समोर आले आहे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या निर्देशानुसार इयत्ता २री, ३री व ४थी तसेच ६वीच्या बदललेल्या अभ्यासक्रमानुसार शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. बदललेल्या अभ्यासक्रमाची माहिती शिक्षकांना देऊन त्यानुसार विद्यार्थ्यांना अध्यापन करता यावे, हा या प्रशिक्षणामागील प्रमुख उद्देश आहे.

मात्र, प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी हजेरी पटावरील आकडेवारी आणि प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये मोठी तफावत दिसून आली. जिल्हा परिषद शाळांचे १२७ शिक्षक आणि खासगी शाळांचे ६४ शिक्षक, असे एकूण १९१ शिक्षक हजेरी पटावर असल्याचे सांगण्यात आले. मात्र दुपारी प्रत्यक्ष पाहणी केली असता जि. प.चे ४३ तर खासगी शाळांचे केवळ १३ शिक्षक, असे

एकूण ५६ शिक्षकच उपस्थित आढळले.

प्रशिक्षणाच्या वर्गखोलीनिहाय उपस्थितीची पाहणी केली असता वर्गखोली क्रमांक १ मध्ये १३ महिला व २४ पुरुष, तर वर्गखोली क्रमांक २ मध्ये ५ महिला व १४ पुरुष उपस्थित असल्याचे दिसून आले. यामध्ये जिल्हा परिषदेचे २८ पुरुष व १५ महिला, तर खासगी शाळांचे १० पुरुष व ३ महिला शिक्षक उपस्थित होते.

या प्रकरणातील आणखी एक विशेष बाब म्हणजे ज्या शाळेत हे प्रशिक्षण सुरू होते, त्याच शाळेतील शिक्षकही प्रशिक्षणासाठी गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रशिक्षणाच्या आयोजनाबरोबरच शिक्षकांच्या उपस्थितीबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.याबाबत शिक्षणाधिकारी प्राथमिक संघरत्न सरोदे यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही

बदललेल्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण, मग शिक्षकच गैरहजर का? : विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम प्रभावीपणे शिकवण्यासाठी शिक्षकांना अभ्यासक्रमातील बदल, अध्यापन पद्धती आणि अपेक्षित शैक्षणिक परिणाम समजणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी शासनाकडून प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. मात्र, ज्या प्रशिक्षणाला शिक्षकांनीच उपस्थिती लावली नाही, त्या प्रशिक्षणाचा उद्देश साध्य होणार कसा? असा सवाल उपस्थित होत आहे.

हजेरी पटावर १९१ शिक्षकांची नोंद असताना प्रत्यक्ष केवळ ५६ शिक्षक उपस्थित असल्याने उर्वरित १३५ शिक्षकांच्या अनुपस्थितीची कारणे काय? त्यांना पूर्वपरवानगी होती का? याची पडताळणी होणे गरजेचे आहे. तसेच अनुपस्थित शिक्षकांना या प्रशिक्षणातील माहिती कशाप्रकारे देण्यात येणार, याबाबतही स्पष्टता आवश्यक आहे.

शिक्षक प्रशिक्षणालाच गैरहजर राहिले आणि नव्या अभ्यासक्रमाची माहिती घेतली नाही, तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर होणार नाही का? असा सवाल पालकांकडूनही उपस्थित होऊ शकतो. त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन हजेरी पट आणि प्रत्यक्ष उपस्थितीची पडताळणी करून गैरहजर शिक्षकांबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

25 हजार झोपडीधारकांना दिलासा!

'अभय योजने'चा विस्तार; आशिष शेलारांचे निर्देश

मुंबई : परिशिष्ट-२ नंतर अपात्र ठरलेल्या झोपडीचे हस्तांतरण झाल्यामुळे अभय योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या झोपडीधारकांना दिलासा देण्यासाठी योजनेचा विस्तार करण्याचे निर्देश पालकमंत्री, मुंबई उपनगर तसेच माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

सन २००० पूर्वीच्या तसेच सन २००० ते २०११ या कालावधीतील झोपडीधारकांना, केवळ हस्तांतरणाच्या कारणामुळे अभय योजनेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशा सूचना मंत्री शेलार यांनी दिल्या. या निर्णयामुळे पात्र झोपडीधारकांना अभय योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. सन २००० ते २०११ दरम्यानच्या सशुल्क पात्र-अपात्र झोपडीधारकांचाही अभय योजनेत समावेश करून त्यांना लाभ देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री शेलार यांनी दिले. या निर्णयामुळे सुमारे २५ हजार वंचित झोपडीधारकांना अभय योजनेचा लाभ मिळणार असून त्यांच्या पुनर्वसनाचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार आहे.

ट्रान्सफॉर्मरमधून तांबा धातू चोरीला; अद्यापही तक्रार दाखल नाही

फुलंब्री/प्रतिनिधी

विद्युत पुरवठा वारंवार खंडित होऊ नये गरजे इतका विद्युत पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी वडोद बाजार सब स्टेशन आवारात जास्त क्षमतेचा नवा ट्रान्सफॉर्मर आणून ठेवला होता . तो कार्यान्वीत होण्यासाठी जवळपास ४ महिन्यापेक्षा जास्त काळ गेला मात्र सदर कंपनीने तो बसवलाच नाही . याच नवीन ट्रॉसफॉर्मर मधुन ऑईल नाल्यात सोडून कोरडा पडल्या नंतर त्यातील लाखो रुपये किमतीचे कॉपर (तांबे) चोरट्यांनी लाबवल्याची घटना उघड होऊन बराच वेळ झाला परंतु या चोरीबाबत गुप्तता पाळली जात आहे .

विद्युत उपकेंद्र आणि सब स्टेशनच्या आवारात ठेवण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मरमधून महागडे कॉपर (तांबे) आणि ट्रान्सफॉर्मर ऑईल चोरीला जाण्याच्या दोन घटनांनी विद्युत यंत्रणेच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार सब स्टेशन आवारात नव्या ट्रान्सफॉर्मरमधून लाखो रुपये

किमतीचे तांबे चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी अद्याप पोलिसांत तक्रार दाखल झालेली नाही. दुसरीकडे भडगाव तालुक्यातील कजगाव विद्युत उपकेंद्रात ट्रान्सफॉर्मर फोडून सुमारे ४ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला असून, याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वडोद बाजार सब स्टेशनअंतर्गत गावांचा विद्युत पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी वाढीव क्षमतेचा १० एमव्हीएचा नवीन ट्रान्सफॉर्मर १३ एप्रिल २०२६ रोजी विद्युत वितरण कंपनीच्या आवारात आणून ठेवण्यात आला होता. मात्र, चार महिन्यांहून अधिक काळ उलटूनही हा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आलेला नव्हता. दरम्यान, ४ सप्टेंबर रोजी सकाळी या ट्रान्सफॉर्मरमधील तांबा चोरीला गेल्याचे निदर्शनास आले.

प्राथमिक माहितीनुसार, चोरट्यांनी ट्रान्सफॉर्मरमधील जवळपास ५ हजार लिटर ऑईल पाईपच्या माध्यमातून नाल्यात सोडले. ट्रान्सफॉर्मर कोरडा झाल्यानंतर त्यातील मौल्यवान कॉपर काढून नेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. ट्रान्सफॉर्मर उघडण्यासाठी मोठ्या प्रमाणात तांत्रिक कौशल्य आणि साधनांची आवश्यकता असल्याने ही चोरी एका-दोन रात्रीत किंवा अनोळखी व्यक्तींनी सहज केली असावी का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे सब स्टेशनचे कार्यालय ट्रान्सफॉर्मरपासून अवघ्या काही अंतरावर असून, तेथे कर्मचारी कार्यरत असतात. तसेच जवळच पोलीस ठाणेही आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर ऑईल काढणे, ट्रान्सफॉर्मर उघडणे आणि कॉपर काढून नेणे यासाठी आतल्या व्यक्तींची माहिती किंवा मदत घेतली गेली असण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. मात्र, याबाबत अधिकृतपणे कोणावरही संशय व्यक्त करण्यात आलेला नाही.

सदर ट्रान्सफॉर्मरची निर्मिती Tesla Transformers (India) Limited, औद्योगिक क्षेत्र, गोविंदपुरा, भोपाळ या कंपनीने केली आहे. ट्रान्सफॉर्मरमध्ये विविध व्हॉल्व्ह, रेडिएटर्स, बुचहोल्झ रिले, कंझर्वेटर आदी महत्त्वाची उपकरणे आहेत. या घटनेमुळे ट्रान्सफॉर्मरचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, नेमका किती किमतीचा तांबा चोरीला गेला, याचे मूल्यांकन अद्याप झालेले नाही.

SBI
भारतीय स्टेट बँक
केंद्रीय भरती व पदोन्नती विभाग, कॉर्पोरेट सेंटर, मुंबई
इमेल: crpd@sbi.co.in
अर्जासाठी क्यूआर स्कॅन करा

कंत्राटी तत्त्वावर विशेषज्ञ संवर्ग अधिकारी नियुक्ति

भारतीय नागरिकांकडून कंत्राटी आधारावर खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

जाहिरात क्र.: CRPD/SCO/२०२६-२७/२३ (कंत्राटी पदे)

पदाचे नाव	रिक्त जागा	वय (३१.०७.२०२६ पर्यंत) किमान	कमाल
झोनल प्रमुख (रिटेल)	१	३५	५०
प्रादेशिक प्रमुख (आरएच)	५	३५	५०
रिलेशनशिप व्यवस्थापक–टीम लीड	२४	२८	४२
गुंतवणूक विशेषज्ञ (आयएस)	९	२८	४२
गुंतवणूक अधिकारी (आयओ)	४	२८	४०
व्ही.पी. वेल्थ	९१	२६	४२
एव्हीपी वेल्थ	७३	२३	३५

पात्रता निकष (वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, नोकरीचे तपशील इत्यादि), रिक्त जागा तपशील, आवश्यक शुल्क आणि इतर तपशीलासाठी उपरोक्त विस्तृत जाहिरात क्रमांकांतर्गत बँकेच्या वेबसाईटवर https://sbi.bank.in/web/careers/current-openings लॉग ऑन करा. येथे ऑनलाईन अर्ज दाखल करण्याच्या व ऑनलाईन अर्ज शुल्क प्रदान करण्याच्या लिंक उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी व शुल्क भरण्यापूर्वी सविस्तर जाहिरात बघून आपली पात्रता आणि इतर तपशील यांची खात्री करण्यासाठी तपशीलवार जाहिरात तपासुन घ्यावी. काही शंका असल्यास, कृपया आम्हाला "CONTACT US" → "Post Your Query" या लिंकद्वारे लिहा, जी बँकेची वेबसाईट (https://sbi.bank.in/web/careers/post-your-query) वर उपलब्ध आहे.

- ऑनलाईन अर्ज भरण्याची व शुल्क भरण्याची तारीख : ०४.०९.२०२६ ते २५.०९.२०२६

स्थान: मुंबई
दिनांक: ०४.०९.२०२६
महाव्यवस्थापक (आरपी आणि पीएम)

गिरगांव चा राजा ने खोले 99वें गणेशोत्सव के द्वार

मुंबई : मुंबई में गणेश चतुर्थी की तैयारियों के बीच, शहर के प्रमुख और लंबे समय से चली आ रही गणेश मंडलों में से एक गिरगांव चा राजा ने अपने 99वें गणेशोत्सव के लिए श्री मंदिर ऐप के साथ साझेदारी की है। इसके जरिए देशभर के श्रद्धालु, जो पंडाल में व्यक्तिगत रूप से उपस्थित नहीं हो सकते, 11 दिवसीय उत्सव के दौरान पूजा में भाग ले सकेंगे, चढ़ावा अर्पित कर सकेंगे और नाम संकल्प एवं सेवा में शामिल हो सकेंगे। इस वर्ष मंडल में लगभग 24 फीट ऊंची और 3.5 टन वजनी पर्यावरण-अनुकूल गणेश प्रतिमा विराजमान होगी, जो मुंबई की सबसे ऊंची पर्यावरण-अनुकूल गणेश प्रतिमा है। भारत के सबसे बड़े भक्ति मंच श्री मंदिर ऐप ने 4 करोड़ से अधिक डाउनलोड का आंकड़ा पार कर लिया है और भारत सहित विदेशों में लाखों श्रद्धालु इस पर भरोसा करते हैं। यह प्लेटफॉर्म 50 लाख मासिक सक्रिय उपयोगकर्ताओं तक पहुंचता है, जिनमें 5 लाख दैनिक सक्रिय उपयोगकर्ता शामिल हैं, और भारतभर के 100 से अधिक मंदिरों के साथ जुड़ा हुआ है। श्री मंदिर ऐप तकनीक के माध्यम से भौगोलिक दूरी के बावजूद श्रद्धालुओं को मंदिरों से जुड़े रहने और धार्मिक अनुष्ठानों में भाग लेने में मदद करता है, जबकि पूजा, चढ़ावा और अन्य अनुष्ठान मंदिरों एवं धार्मिक संस्थानों में उनकी परंपराओं के अनुसार ही संपन्न किए जाते हैं।

पहिल्याच दिवशी 100 ईव्ही ची डिलिव्हरी

जळगाव : कायनेटिक वॅव्ह अँड वोल्व्ह लिमिटेड, भारतातील इलेक्ट्रिक मोबिलिटी बाजारपेठेत सातत्याने आपली उपस्थिती विस्तारत असलेला आयकॉनिक दुचाकी ब्रँड, यांनी 15 ऑगस्ट 2026 रोजी जळगावमध्ये आपल्या नवीन सुविधेचे उद्घाटन केले. महाराष्ट्रातील वाढत्या रिटेल आणि ग्राहक नेटवर्कच्या विस्ताराच्या दिशेने हे आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.उद्घाटनाला ग्राहक, भागीदार आणि स्थानिक समुदायाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उद्घाटनाच्या दिवशी 100 कायनेटिक इलेक्ट्रिक स्कूटरची डिलिव्हरी करण्यात आली. यापैकी 50 स्कूटर जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन च्या सदस्यांना, तर आणखी 50 स्कूटर ग्राहकांना वितरित करण्यात आल्या. यावरून या भागात कायनेटिक च्या इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांबद्दल असलेली मजबूत उत्सुकता आणि वाढती स्वीकारार्हता स्पष्ट होते.

उत्तम हालचाल व निरोगी जीवनशैलीसाठी फिजिओथेरपी महत्वपूर्ण

छत्रपती संभाजीनगर,- फिजिओथेरपी ही केवळ वेदना कमी करण्यापुरती मर्यादित नाही. ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेनंतरचे पुनर्वसन, क्रीडा दुखापती, न्यूरोलॉजिकल समस्या, स्नायू व सांध्यांशी संबंधित विकार तसेच विविध शारीरिक मर्यादांमध्ये फिजिओथेरपी महत्त्वाची भूमिका बजावते. रुग्णाला दैनंदिन कामे अधिक सहजपणे करण्याची क्षमता पुन्हा मिळवून देण्यासही याचा मोठा फायदा होतो. डॉ. विशाल कुटे, सेंटर हेड, मेडिकव्हर हॉस्पिटल्स म्हणाले, की"आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शरीराची हालचाल सक्षम असणे आणि दैनंदिन जीवन आत्मविश्वासाने जगता येणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आधुनिक उपचारपद्धतीमध्ये फिजिओथेरपीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. शस्त्रक्रियेनंतरचा पुनर्वसन कालावधी कमी करण्यापासून ते दुखापतीनंतर शरीराची कार्यक्षमता पूर्ववत करण्यापर्यंत फिजिओथेरपी रुग्णाच्या आरोग्यप्रवासात महत्त्वाची भूमिका बजावते. योग्य वेळी तज्ज्ञांचा सल्ला आणि नियमित फिजिओथेरपी घेतल्यास अनेक रुग्णांना पुन्हा सक्रिय आणि स्वावलंबी जीवन जगण्यास मदत होते."

सॅमसंगकडून आकर्षक फेस्टिव्ह ऑफर्स जाहीर

छत्रपती संभाजीनगर,- - सॅमसंगने आज भारतातील सणासुदीच्या हंगामापूर्वी आपल्या फ्लॅगशिप गॅलेक्सी टॅब एस१०+ टॅब्लेटवर आकर्षक ऑफर्स जाहीर केल्या आहेत. गॅलेक्सी टॅब एस१०+ मध्ये अत्याधुनिक हार्डवेअर आणि एआय-संचालित वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे काम, मनोरंजन आणि स्मार्ट होम व्यवस्थापनासाठी वैविध्यपूर्ण डिवाईस शोधणाऱ्या व्यावसायिक, सर्जनशील व्यक्ती आणि तंत्रज्ञानप्रेमींसाठी हा टॅब योग्य पर्याय ठरतो.गॅलेक्सी टॅब एस१०+ मध्ये ३१.४७ सेमी डायनॅमिक एएमओएलईडी २एक्स डिस्प्ले अँटी-रिफ्लेक्टिव्ह तंत्रज्ञानासह येतो, जो ग्लेअर कमी करून आकर्षक व्हिज्युअल्स प्रदान करतो. तुम्ही डॉक्यूमेंट्सवर काम करत असा, सादरीकरणांचे (प्रेझेंटेशन्स) पुनरावलोकन करत असा किंवा कंटेंट स्ट्रीम करत असा, हा डिस्प्ले उत्साहवर्धक अनुभव सुनिश्चित करतो. गॅलेक्सी टॅब एस१०+ चा क्वॉड-स्पीकर सेटअप, एआय-संचालित डायलॉग बूस्टने सुसज्ज असून स्पष्ट ऑडिओ प्रदान करतो, तर त्याचे आयपी६८ रेटिंग आणि आर्मर ॲल्युमिनियम रचना दैनंदिन वापरासाठी टिकाऊपणा सुनिश्चित करते.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियलच्या टर्म प्लॅन व्यवसायात दमदार वाढ

छत्रपती संभाजीनगर - कंपनीने महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत टर्म प्लॅन (रिटेल प्रोटेक्शन) व्यवसायात वार्षिक आधारावर ६६.३ टक्के प्रबळ वाढ नोंदवली आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत कंपनीने राज्यातील ३१,९२,१०८ व्यक्तींना विमा संरक्षण दिले आहे. कंपनीला महाराष्ट्र राज्यात लिंक केलेल्या, नॉन-लिंक केलेल्या आणि ॲन्युइटी व्यवसायाचा समावेश असलेल्या बचत व्यवसायातही मोठी मागणी मिळत आहे.३१ मार्च २०२६ पर्यंत राज्यातील कंपनीचे व्यवस्थापनाखालील मालमत्ता मूल्य (एयूएम) ५२,३०३ कोटी रूपये होते. महत्त्वाचे म्हणजे, कंपनीने ३१ मार्च २०२६ पर्यंत राज्यात ४,९४,२०३ कोटी रूपयांच्या सम ॲश्युअर्डची (विमा संरक्षण रक्कम) नोंद केली आहे आणि गेल्या ७ वर्षांत कंपनीने महाराष्ट्र राज्यातील आपल्या ग्राहकांना एकूण १५,६५५ कोटी रूपये मूल्याचे लाभ अदा केले आहेत.

करुणा पांडे ने साजरा केला आपला वाढदिवस

सोनी सबच्या पुष्पा इम्पॉसिबलच्या सेटवर आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते, कारण संपूर्ण कलाकार आणि तांत्रिक टीम एकत्र येऊन शोच्या लीडिंग लेडी करुणा पांडे यांचा वाढदिवस साजरा करत होते. पुष्पा पटेलची मनापासून केलेली भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या करुणाला त्यांच्या ऑन-स्क्रीन कुटुंबाकडून केक, फुलं आणि मनापासून दिलेल्या शुभेच्छांनी सरप्राईज देण्यात आलं. शोच्या चार वर्षांच्या प्रवासात कॅमेऱ्याच्या पलीकडेही घट्ट झालेलं हे नातं या सेलिब्रेशनमध्ये अधिकच उजळून निघालं.

Karnataka Bank Ltd.
Your Family Bank. Across India.
Chhatrapati Sambhajinagar Branch

NOTICE

The following persons who have availed loans against pledge of gold ornaments have not repaid the amount in spite of our demand notices. Therefore, please take notice that if the principal / interest and other charges are not paid on or **before 12/10/2026** the pledged ornaments will be publicly auctioned **on 13/10/2026 At Karnataka Bank, Chhatrapati SambhajiNagar Branch 4.00 p.m** in the Bank's premises subject to rules and regulations of the Bank. The Bank reserves the right to cancel / postpone the auction to any other convenient date without further notice and assigning reasons therefor.

Sl. No	Gold Loan A/c No. & date	Name of the Borrower	Liability in Rs.
1	0317002100191101 & 16-12-2023	Ankush Mahadev Choure	89,706.50

Place: Chhatrapati Sambhajinagar / Date : 08.09.2026 Branch Head

युवा महोत्सवामध्ये स्वा. सावरकर महाविद्यालयास पाच पारितोषिके

बीड (प्रतिनिधी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सव हा यावर्षी पंडित पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा येथे संपन्न झाला. या युवक महोत्सवात सावरकर महाविद्यालयाला पाच पारितोषिक मिळाली. या महोत्सवामध्ये एकूण 72 विविध महाविद्यालयाच्या संघाने सहभाग नोंदवला होता. दिनांक 4 आणि 5 सप्टेंबर या दोन दिवसांच्या युवा महोत्सवामध्ये याही वर्षी शोभायात्रा या स्पर्धा प्रकारांमध्ये आपली परंपरा कायम चालू ठेवत सर्व द्वितीय क्रमांक मिळवला. यामध्ये भारतीय ज्ञान परंपरा या विषयाला पूरक म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतातील प्राचीन संशोधन ज्ञान परंपरा आणि मानवतावादी ज्ञान परंपरा हा विषय घेऊन संशोधन परंपरांमध्ये आचार्य पाणिनी,चरक, सुश्रुत आर्यभट्ट, भास्कराचार्य यांचा कालखंड व संशोधनाची बाजू स्पष्ट केली. तर दुसऱ्या बाजूस तथागत गौतम बुद्ध यांच्या अष्टांगिक मार्ग संत ज्ञानेश्वराचे पसायदान, संत कबीराचे दोहे, जगद्गुरु तुकाराम महाराज यांची अभंग गाथा या सर्वांचा समन्वय दृश्य स्वरूपामध्ये शोभायात्रेत दाखवण्यात आला होता.याबरोबरच शास्त्रीय तालवाद्य तृतीय पारितोषक, शास्त्रीय संगीत द्वितीय पारितोषिक, सुगम संगीत द्वितीय आणि नाट्यसंगीत प्रथम पारितोषक महाविद्यालयास प्राप्त झाले. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे आणि उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर,उपप्राचार्य डॉ. रमेश खंडागळे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयातील एकूण सोळा विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पारितोषिक प्राप्त केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड जोगेंद्र व सदस्य प्रा. राम गव्हाणे, प्रा.दीपा देशपांडे आणि रुक्मिणीकांत पांडव यांनी विशेष श्रम घेतले तसेच विद्यार्थ्यांमध्ये वेद मुळे, कृष्णा खामकर, नागेश मिटकरी, श्रेयश राऊत ,शुभम पांचाळ ,ज्ञानेश्वर बनसोडे, गोपाळ काळे, कु. वैष्णवी यादव, नंदिनी रुईकर राधा घिगे, तनिषा हिरण विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सर्व विजयी स्पर्धकांचे महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. रमेश खंडागळे यांनी अभिनंदन केले आहे .

चौसाळा महाविद्यालयात साक्षरता रॅली संपन्न

चौसाळा : कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयीन विद्यार्थी -विद्यार्थिनींची साक्षरता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे पदव्युत्तर संचालक प्रा. डॉ. सुधाकर वनवे आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक प्रोफेसर प्रशांत साबळे, प्रा. डॉ. पंढरीनाथ हिरवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. ही रॅली धोतरा परिसरात काढण्यात आली. शिक्षण हेच प्रगतीचे साधन, साक्षर जनता भूषण भारता, शिक्षणाशिवाय प्रगती नाही अशा घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या. या रॅलीच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक प्रोफेसर प्रशांत साबळे प्रा डॉ. विलास भिलारे, प्रा. सुधीर माने, डॉ. संजय कदम, प्रा. कुशाबा साळुंखे, प्रा. ओम चाळक, प्रा. अक्षय झंवर,प्रा. अश्विनी तुवर, प्रा. मनीषा रेवगडे प्रा. शारदा ताटी कोंडीलवार प्रा. सीमा पवार प्रा. डॉ. मंजुषा रसाळ प्रा. स्वाती हंगे यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्य उपस्थित होते

समता क्रांती मार्च रॅली ताकदीने यशस्वी करा-पप्पू कागदे

रिपाइंच्या जिल्हा पदाधिकारी बैठकीत आवाहन

बीड/प्रतिनिधी : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने राज्यभर समता क्रांती मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. समता क्रांती मार्च रॅलीच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. 16 ऑक्टोबर 2026 शुक्रवार रोजी बीड शहरात समता क्रांती मार्च रॅली व जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वत यारीसाठी दि.8 सप्टेंबर 2026 मंगळवार रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात बीड जिल्हा रिपाइं पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची मशाल घेऊन या देशात समता नांदावी ही भूमिका घेऊन महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला 75 वर्षे पूर्ण झाले असून यावर्षी क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांची 200 वी जयंती देशभरात साजरी करण्यात येत आहे. या क्षणांचे औचित्य साधून राज्यभर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली समता क्रांती मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. दि. 16 ऑक्टोबर 2026 शुक्रवार रोजी बीड शहरात होणाऱ्या समता क्रांती मार्च रॅली यशस्वी करण्यासाठी व आपल्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी समता क्रांती मार्च रॅली यशस्वी करण्यासाठी जिल्हाभर रिपाइं कार्यकर्त्यांनी ताकदीने कामाला लागावे. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी बीड जिल्हा रिपाइं पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केले.

कंकालेश्वर मंदिरात श्री शिवमहापुराण कथा, 11 सप्टेंबरपर्यंत भक्तिमय वातावरण

बीड प्रतिनिधी : शहरातील श्री कंकालेश्वर भक्त मंडळाच्या वतीने आणि परमपूज्य संत-महात्म्यांच्या आशीर्वादाने श्री शिवमहापुराण कथा सोहळा सुरू झालेला आले आहे. श्री कंकालेश्वर मंदिर, बीड येथे हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात सुरू आहे.

या शिवमहापुराण कथेचे कथावाचक राष्ट्रसंत स्वामी गोविंददेव गिरी महाराजांचे पट्टशिष्य परमपूज्य श्री प्रणव शास्त्री धानोरेकर महाराज, पुणे हे आहेत. ३ सप्टेंबर २०२६ रोजी कथेचा शुभारंभ झाला असून ११ सप्टेंबर २०२६ रोजी कथेची सांगता होणार आहे. दररोज दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत कथा आयोजित करण्यात आली आहे.

कथेच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता बालाजी मंदिर येथून काळा हनुमानठाणा मार्गे कंकालेश्वर मंदिरापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

तसेच ८ व ९ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत लिंगार्चनाचा कार्यक्रम होणार असून यामध्ये कुंकुम अर्चन आणि रुद्राक्ष वाटप करण्यात येणार आहे. ११ सप्टेंबर रोजी दुपारी १ ते ३ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

भगवान श्री महादेवांच्या कृपाशीर्वादाने आयोजित या शिवमहापुराण कथा सोहळ्याचा लाभ बीड शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन श्री कंकालेश्वर भक्त मंडळाच्या वतीने संजय महाराज गुरव यांनी केले आहे.

तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनमध्ये आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी) : देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मंगळवार दि. ८ रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा आणि पोस्टर पेंटिंग स्पर्धेचे विशेष आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी साक्षरतेचा संदेश देणारे आकर्षक पोस्टर्स आणि सुरेख रांगोळ्या रेखाटून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धांमध्ये श्वेता लाड व श्रुतिका दिंडे यांनी संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला, तर प्रगती कुळते हिने द्वितीय आणि शिवानी कुऱ्हे व श्रद्धा कोथुळे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. तसेच वैष्णवी पोते हिला उत्तेजनार्थ पारितोषिकाने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास सुप्रिया ससाणे, वृषाली लोखंडे आणि कार्यक्रम अधिकारी श्वेता वंजारे यांची उपस्थिती लाभली. प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे यांनी विजेत्या स्पर्धकांचे कौतुक करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी) : देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन येथे शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात विद्यार्थिनींनी दिवसभर प्रत्यक्ष वर्ग अध्यापन तसेच प्रशासकीय कामकाज यशस्वीपणे सांभाळले. एका दिवसाच्या शिक्षक व प्रशासकीय अधिकारी बनून विद्यार्थिनींनी अध्यापन आणि व्यवस्थापनाचा उत्तम अनुभव घेतला.

दिवसभराच्या या उपक्रमानंतर आयोजित मुख्य सोहळ्यात विद्यार्थिनींनी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन त्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे कौतुक करत त्यांना भावी आयुष्यासाठी व फॅशन डिझायनिंग क्षेत्रातील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

केज तालुक्यातील निकृष्ट रस्त्यांविरोधात क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा आंदोलनाचा इशारा

एक वर्षातच रस्ते उखडले; गुणवत्तेची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

बीड / प्रतिनिधी : केज तालुक्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या काही रस्त्यांच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता व निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेने केला आहे. रस्ते तयार होऊन अवघे एक वर्ष होत असतानाच ते उखडू लागल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकरणाची गुणनियंत्रण विभागामार्फत चौकशी करून दोषी कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी संदर्भात क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हंटले आहे, केज

तालुक्यातील चंदनसावरगाव–जवळबन–सावळेश्वर–आवसगाव या रस्त्याचे काम सिद्धेश्वर कन्स्ट्रक्शन, धाराशिव यांच्याकडून, तर जवळबन–लाडेगाव रस्त्याचे काम राज कंट्रक्शन, केज यांच्याकडून करण्यात आले आहे. या रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यात आले होते. मात्र, कोणताही मोठा पाऊस किंवा नैसर्गिक आपत्ती नसतानाही अवघ्या एका वर्षात रस्ते उखडू लागल्याचा आरोप संघटनेने केला आहे. काही ठिकाणी रस्त्यावरील डांबर हाताने निघत असल्याने कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. संघटनेने संबंधित रस्त्यांच्या कामाची तातडीने गुणवत्ता तपासणी करण्याची मागणी केली आहे. तसेच निकृष्ट कामाची सखोल चौकशी करून दोषी कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे आणि संबंधित रस्त्यांची पुढील पाच वर्षांसाठी दर्जेदारपणे दुरुस्ती करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

१७ सप्टेंबरला बेमुदत रस्ता रोको आंदोलनाचा इशारा

या प्रकरणी आठ दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास १७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी अंबाजोगाई–कळंब महामार्गावरील सावळेश्वर येथे ग्रामस्थांच्या वतीने बेमुदत रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेने दिला आहे.

पहिल्या कॅबिनेटमध्ये आरक्षण देवू म्हणणाऱ्या भाजपने धनगर समाजला फसवलं

नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीसांकडून धनगर समाजाचा अपमान; बीड येथे मल्हार योद्धे दिपक बोऱ्हाडे यांची पत्रकार परिषद

17 रोजी परभणी येथे समाजाचा महामेळावा

बीड/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील धनगर समाजाचे घटनात्मक एसटी आरक्षणासाठी गेल्या ७० वर्षांपासून आंदोलन सुरुच असून २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'आम्ही सत्तेत आल्यावर पहिल्याच कॅबिनेटमध्ये धनगर समाजाच्या घटनात्मक एसटी आरक्षणाचा प्रश्न सोडवू' असे आश्वासन दिले. आज जवळपास १०० पेक्षा जादा कॅबिनेट झाल्या तरी देखील धनगर समाजाच्या घटनात्मक एसटी अरक्षणाचा देवेंद्र फडवणी यांनी प्रश्न मार्गी लावला नसून भाजप सरकारने धनगर समाजाचा अपमान केला असल्याचा आरोप मल्हार योद्धे दिपक बोऱ्हाडे यांनी बीड येथील आयोजित पत्रकार परिषदेत केला.

2029 पर्यंत आरक्षण लढा लढणार

धनगर समाजला एसटी प्रवर्गाचे घटनात्मक आरक्षण पहिल्या कॅबिनेटमध्ये देवू असे आश्वासन फडणवीस यांनी दिले मात्र त्यांनी धनगर समाजाचा मोठा अपमान केला आहे. आपल्याला फक्त भाजपलाच आरक्षण मागण्याचा अधिकार आहे, विरोधी पक्षांनी आपल्याला आश्वासन दिलेलेच नाही २०२९ च्या नंतर भाजप सत्तेत राहिल की नाही हे सांगता येत नाही, त्यामुळे आपण फक्त २०२९ पर्यंतच आरक्षण लढा लढत राहणार असल्याची खंत दिपक बोऱ्हाडे यांनी व्यक्त केली.

बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे परभणी येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनी होत असलेल्या धनगर समाजा महामेळाव्याच्या पुर्व तयारीनिमित्त धनगर समाजाच्या व्यापक बैठकीचे आयोजन सकल धनगर समाजाच्या वतीने करण्यात आले होते. या बैठकीला धनगर समाजाच्या आरक्षणासाठी आहोरात्र संघर्ष करणारे दिपक बोऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पत्रकार परिषदेत बोराडे यांनी मुख्यमंत्री व सरकारवर संताप व्यक्त केला.एकीकडे मनोज जरांगे पाटील यांच्या पायापाशी सर्व मंत्रीमंडळ, प्रशासन शिव्या खावून ठाण मांडून बसत आहे आणि आम्ही दारात उभा असताना देखील आमची कोणी दखल घेणार नसेल तर धनगर भोळा आहे मात्र त्याला तिसरा डोळा आहे. आम्हाला भाजपने आश्वासन दिले त्यामुळे आम्ही २०२९ पर्यंत भाजपला आरक्षण मागू आणि आरक्षणाची अंमलबजाणी लवकर नाही झाली तर धनगरी हिसका दाखवू अशा शब्दात बोऱ्हाडे यांनी फडणवीस यांच्यावर संताप व्यक्त केला. मोदी, फडणवीसांच्या मानगुटीवर बसल्याशिवाय त्यांना जाग येणार नाही. पंढरपुर, जालना व मुंबई येथील आंदोलनातील दिलेल्या एकाही आश्वासनांची फडवीसांनी पुर्तता केली नाही. फडणवीसांची दुटप्पी भूमिका धनगर समाजाच्या लक्षात येत आहे. जर फडवीसाला शिव्यांची भाषा कळत असेल तर आम्ही धनगर आहोत याची जाणीव फडवीसांना येणाऱ्या काळात होईल. परभणी येथे धनगर समाजाचा महामेळावा होणार आहे.

बीडमधुन हजारो बांधव परभणीला जाणार

परभणी येथे धनगर समाज घटनात्मक एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी मल्हार योद्धे दिपक बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या महामेळाव्याला बीड येथून हजारो समाज बांधव जाणार असून जास्तीत जास्त समाज बांधवांनी परभणीच्या महामेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन सकल धनगर समाज बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

या मेळाव्याला देशभरातील धनगर समाज उपस्थित राहणार असून आरक्षण लढ्याची पुढील दिशा ठरवली जाणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील धनगर समाजाने परभणी येथील महामेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बोऱ्हाडे यांनी केले. यावेळी बैठकीला बीड जिल्ह्यातील सकल धनगर समाजाचे नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

एमजीएममध्ये राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा उत्साहात साजरा

नेत्रदान जनजागृतीसाठी पोस्टर, रांगोळी, नाटकासह विविध उपक्रम; नेत्रदात्यांच्या कुटुंबीयांचा व कॉर्निया प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांचा सत्कार

छत्रपती संभाजीनगर,दि.८ : मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची संधी म्हणजे नेत्रदान. हा विचार घेऊन नेत्रदानाबाबत जनजागृती वाढावी आणि अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, या उद्देशाने एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या नेत्र विभागातर्फे दिनांक २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६ दरम्यान राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी पोस्टर, रांगोळी स्पर्धा तसेच नाटकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी नेत्रदानाचे महत्त्व, त्याबाबतचे गैरसमज आणि सामाजिक संदेश प्रभावीपणे मांडला. एमजीएम स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. नेत्रदानाचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचविण्यासाठी नेत्र विभागातील डॉ. योगिता गायकवाड यांनी रेडिओच्या माध्यमातून नेत्रदानाचे महत्त्व, प्रक्रिया आणि गैरसमज याबाबत माहिती दिली.

दुःखाच्या प्रसंगीही आपल्या आप्ताचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेणाऱ्या नेत्रदात्यांच्या कुटुंबीयांचा यावेळी भावपूर्ण सन्मान करण्यात आला. त्यांच्या निर्णयामुळे गरजू रुग्णांना दृष्टी मिळण्यास मदत झाली. कुटुंबीयांनी आपल्या प्रियजनांच्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. नेत्रदानातून मिळालेल्या कॉर्नियामुळे दृष्टी प्राप्त झालेल्या रुग्णांचाही विशेष सत्कार करण्यात आला. दाते आणि लाभार्थी यांना एकत्र आणणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरला. यावेळी नेत्रदानासोबतच अवयवदानाचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

एमजीएमच्या नेत्र विभागात गेल्या २७ वर्षांपासून समुपदेशक म्हणून कार्यरत असलेल्या उज्वला भगत यांचा प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेसाठी विशेष सत्कार करण्यात आला. नेत्रदानासाठी कुटुंबीयांचे समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात समुपदेशकांची महत्त्वाची भूमिका असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाला एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.राजेंद्र बोहरा, उपअधिष्ठाता तथा झेडटीसीसीचे अध्यक्ष डॉ.प्रवीण सूर्यवंशी, झेडटीसीसीचे फाउंडर प्रेसिडेंट डॉ. सुधीर कुलकर्णी, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. अपर्णा कक्कड, कोषाध्यक्ष डॉ.क्षितिजा गाडेकर, नेत्र विभाग व एमजीएम आय डोनेशन सेंटरच्या प्रमुख डॉ.सारिका गाडेकर यांच्यासह डॉक्टर, कर्मचारी, विद्यार्थी, रुग्ण व नातेवाईक उपस्थित होते.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.ज्योतिका मिश्रिकोटकर, डॉ.स्नेहल ठाकरे, डॉ.प्रज्ञा देशमुख, डॉ.सुप्रिया देशपांडे, डॉ.सुवर्णा बेलापूरकर, डॉ.विनीत ओसवाल तसेच प्रतिक राऊत, दीपक जाधव, विशाखा जोशी, संकेत गाडेकर, जगदीश क्षीरसागर, लक्ष्मी पाचऊंदे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ.शरयू शिंदे व डॉ. शिवांजली शर्मा यांनी केले तर आभार डॉ. सारिका गाडेकर यांनी मानले.

जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा सोयगाव येथे दहीहंडी उत्सव साजरा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ सप्टेंबर - जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा सोयगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत मानवी मनोरा रचून दहीहंडी फोडण्याचा थरारक अनुभव घेतला. परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षक वृंद यांनीही विद्यार्थ्यांसोबत आनंदाने सहभाग घेतला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकता, संघभावना, सहकार्य आणि आत्मविश्वास यांसारख्या गुणांना चालना मिळाली. या आनंददायी उपक्रमासाठी केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांचे अनमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे दहीहंडी उत्सव अधिक उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडला.

"गोविंदा आला रे आला... गोपाळकाला झाला!" या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला.कार्यक्रम आयोजन करते मुख्याध्यापक हरिदास काटोले, किरणकुमार पाटील,रामचंद्र महाकाळ,मंगला बोरसे,सविता पाटील,गणेश बाविस्कर,अंकुश काळे,विवेक महाजन कला निर्देशक,अनिल देसाई क्रीडा निर्देशक,पुनम लाड,तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

उपचारापेक्षा माणुसकी मोठी... एका रुग्णेच्या अश्रूंनी दिलेला हृदयस्पर्शी अनुभव



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ७ सप्टेबर : डॉ विक्रांत जयसवाल यांच्या Viraj Eye And Dental Hospital मधे दोन तीन दिवसांपूर्वी एक महिला उपचारासाठी आली होती. तपासणीदरम्यान तिच्या दातामध्ये गंभीर संसर्ग झाल्याचे तसेच हिरडीतून पू येत असल्याचे निदर्शनास आले. प्राथमिक उपचार म्हणून तिला आवश्यक औषधे देण्यात आली आणि दोन-तीन दिवसांनी पुन्हा येण्यासाठी सांगितले. सूज व संसर्ग कमी झाल्यानंतर दात काढण्याचा निर्णय घेण्यात आला. रूट कॅनॉल उपचाराचा खर्च परवडत नसल्याने रुग्णेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून दात काढण्याचा सल्ला देण्यात आला ती महिला पुन्हा रुग्णालयात आली. संसर्ग झालेला आणि पूर्णपणे किडलेला दात काढण्यात आला तसेच दाताच्या मुळाशी झालेल्या संसर्गाची आवश्यक ती स्वच्छता व डिब्रायडमेंट करण्यात आले.उपचार पूर्ण झाल्यानंतर जेव्हा बिलाच्या रकमेबाबत विचारणा झाली, तेव्हा ती महिला अचानक रडू लागली. तिने रिसेप्शनवरील कर्मचाऱ्यांचे हात जोडून आभार मानले आणि म्हणाली की, "माझ्यावर इतका चांगला उपचार केल्याबद्दल धन्यवाद." त्यानंतर तिने एक धक्कादायक माहिती सांगितली.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्यासाठी साई कीर्तनकार, प्रवचनकार यांची नियुक्ती



शिर्डी (प्रतिनिधी) साईबाबांच्या विचारांचा, शिकवणुकीचा आणि मानवतावादी संदेशाचा देशभर व्यापक प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या वतीने भारतातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'साई कीर्तनकार, साई प्रवचनकार व साई कथाकार' यांची नियुक्ती करण्यात येणार असून यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

या उपक्रमांतर्गत देशातील ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांसाठी एकूण ५२ पदे उपलब्ध आहेत. यामध्ये आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि ओडिशा या राज्यांसाठी प्रत्येकी ३ पदे, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांसाठी प्रत्येकी २ पदे, तर उर्वरित राज्ये व केंद्रशासित प्रदेशांसाठी प्रत्येकी १ पद निश्चित करण्यात आले आहे.

नियुक्त होणाऱ्या व्यक्तींना श्री साईसच्चरित्र तसेच साईबाबांच्या जीवनकार्याची सखोल माहिती असणे आवश्यक असून, संबंधित राज्यातील स्थानिक भाषेत साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रचार-प्रसार करण्याचा किमान १० वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराविरुद्ध कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित नसावी आणि अर्जासोबत पोलीस पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

नियुक्त व्यक्तींमार्फत विविध ठिकाणी साई प्रवचन, साई कीर्तन, साई सत्संग व साई कथा यांच्या माध्यमातून श्री साईबाबांचे विचार, शिकवणूक व मानवतावादी मूल्ये भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. प्रत्येक नियुक्त व्यक्तीने दरमहा किमान ५ साई प्रवचन, कीर्तन किंवा सत्संग आयोजित करणे अथवा ३ दिवसांच्या प्रत्येकी २ साई कथा आयोजित करणे आवश्यक राहील.

लायन्स क्लबचा महासंगम; 'त्रिनाद' परिषदेत नेतृत्वाचा बुलंद आवाज; समाजसेवा, नेतृत्व विकासावर मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : 'तीन रिजन • एक आवाज • एक मिशन' या ध्येयमंत्राने प्रेरित लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २ अंतर्गत रिजन १, २ आणि ३ यांच्या संयुक्त विद्यमाने 'गॅट कॉन्क्लेव्ह – त्रिनाद'चे आयोजन करण्यात आले. चिकलठाणा येथील खिंवसरा बिझनेस सेंटरमध्ये झालेल्या या परिषदेला लायन्स पदाधिकारी व सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

परिषदेच्या प्रास्ताविकात ला. किशोर ललवाणी यांनी 'गॅट कॉन्क्लेव्ह म्हणजे खऱ्या अर्थाने नेतृत्व घडविणारी शाळा आहे,' असे सांगत परिषदेमागील उद्देश स्पष्ट केला. त्यांच्या नियोजन, दूरदृष्टी आणि प्रेरणेतून या त्रि-रिजनल कॉन्क्लेव्हचे प्रभावी आयोजन करण्यात आले. रिजन १ चे ला. आनंद देसाई आणि रिजन ३ च्या ला. डॉ. अश्विनी आर. जैस्वाल यांच्या सहकार्याने हा महासोहळा यशस्वी झाला.

कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन प्रांतपाल ला. राहुल औसेकर यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी ला. नरेंद्र भंडारी आणि ला. क्षमा गांधी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजसेवेची व्याप्ती वाढविणे, प्रभावी नेतृत्व निर्माण करणे आणि संघटनात्मक बळकटीकरण करण्याची गरज वक्त्यांनी अधोरेखित केली.

या वेळी उपप्रांतपाल ला. सुप्रिया कोतवाल, ला. सुनील देसरडा, फॅकल्टी ला. क्षमा गांधी, माजी प्रांतपाल ला. राजेश राऊत व ला. तनसुख झांबड यांच्यासह सर्व झोन चेअरपर्सन आणि डिस्ट्रिक्ट टीमचे पदाधिकारी उपस्थित होते.

दुष्काळ परिस्थिती, मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन भुमरेंची मागणी

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०८ : मुंबई मंत्रालय येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पैठणचे आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी पैठण तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात निर्माण होत असलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व नागरिकांना भेडसावत असलेल्या विविध अडचणी मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार भुमरे यांनी मराठवाड्यात पावसाअभावी निर्माण झालेली गंभीर परिस्थिती लक्षात घेता कृत्रिम पाऊस, शेतकरी व नागरिकांना विशेष मदत, तातडीच्या उपाययोजना तसेच आवश्यक शासकीय सवलती देण्याबाबत मागणी केली. मराठवाड्यातील जनतेला या संकटातून दिलासा मिळावा, यासाठी शासनाने संवेदनशीलतेने आणि तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आमदार भुमरे यांनी यावेळी व्यक्त केली.

कोहिनूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दीक्षान्त समारंभ उत्साहात

पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव; प्रा. डॉ. मझहर अहमद फारुकी यांचा सेवागौरव



तभा वृत्तसेवा

खुलताबाद, प्रतिनिधी : कोहिनूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खुलताबाद येथे दीक्षान्त समारंभ २०२६–२०२७ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. कमरुन्निसा बेगम होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मौलाना आझाद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरचे माजी प्राचार्य प्रा. डॉ. मझहर अहमद फारुकी तसेच मौलाना आझाद महाविद्यालयाचे निवृत्त उपप्राचार्य प्रा. सकावत खान उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रफीउल्लाह खान, डॉ. सुभाष जिते, परीक्षा विभाग केंद्रप्रमुख डॉ. टी. डी. पठाण तसेच दीक्षान्त सोहळा समितीचे अध्यक्ष डॉ. सय्यद युसुफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत करण्यात आले. दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य प्रा. डॉ. मझहर अहमद फारुकी यांच्या सेवानिवृत्ती निमित्त महाविद्यालयाच्या वतीने सेवागौरव सोहळा आयोजित करण्यात आला. प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. कमरुन्निसा बेगम यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला यावेळी कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. मझहर अहमद फारुकी व मान्यवरांच्या हस्ते सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. वैशाली अजने यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. मझहर अहमद फारुकी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पदवी हा जीवनातील अंतिम टप्पा नसून नव्या प्रवासाची सुरुवात असल्याचे सांगितले.

गंगापूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) ची मागणी



गंगापूर दि.८: गंगापूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तसेच ग्रामीण जनतेला तातडीने मदत जाहीर करावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या वतीने करण्यात आली आहे. तहसीलदार नवनाथ वगवाड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,गंगापूर तालुक्यात कमी पर्जन्यमानामुळे खरीप हंगामातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून जनावरांचा चारा तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यादृष्टीने तालुक्यातील प्रत्येक गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी, पिकांची स्थिती तसेच उपलब्ध पाणीसाठा समस्यांचा आढावा घेऊन, पंचनामे करून तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष कल्याण गायकवाड, सुधीर माने पाटील, नगरसेवक सोपान देशमुख, राजेंद्र सवाई, रामेश्वर परभणे, रमेश चव्हाण, फारुख शेख, गजानन गायकवाड, बाबासाहेब पाठे, तुकाराम सटाले, रामकिसन जाधव, समद पटेल पुरुषोत्तम पदार उपस्थित होते.

बी द चेंज फाउंडेशन शिर्डी, यांचा पुरस्कार- 2026 गणेश लोखंडे यांना 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार 2026' प्रदान

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ सप्टेंबर

सोयगाव तालुक्यातील डाभा येथील रहिवासी तथा भाजपाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्ष व माजी सरपंच गणेश एकनाथ लोखंडे यांना खाजगी तसेच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६' या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बी द चेंज फाउंडेशन, शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी शिर्डी येथे आयोजित कार्यक्रमात गणेश लोखंडे यांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

गणेश लोखंडे यांनी मागील पंधरा वर्षांपासून विविध क्षेत्रांत सामाजिक बांधिलकी जपत उल्लेखनीय कार्य केले आहे. शासन,प्रशासन,खाजगी क्षेत्र तसेच सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी निष्ठा,प्रामाणिकपणा,कार्यतत्परता आणि समाजहिताची जाणीव ठेवून विविध उपक्रम राबविले आहेत.

फर्दापूर येथे भीषण पाणीटंचाई निर्माण झालेल्या काळात त्यांनी सलग तीन महिने स्वखर्चाने टँकरद्वारे नागरिकांना पाणीपुरवठा केला. तसेच मोलखेडा येथे स्वतःच्या मोटार व पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठा करून नागरिकांना दिलासा दिला. फर्दापूर गटात स्वच्छता अभियान, डाभा गावात स्वच्छता मोहीम, हागणदारीमुक्त अभियान, वृक्षलागवड, सॅनिटायझेशन, धूरफवारणी आणि शोषखड्डे निर्माण करण्यासह विविध सामाजिक उपक्रमांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १८९/२०२६ नि. क्र.

१/- शरीफ अब्बास तडवी, वय ६० वर्ष, धंदा शेती, रा. निवायती, ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर, २/- सय्यनूर अब्बास तडवी, वय ५९ वर्ष, धंदा. शेती, रा. वारीप्रमाणे. ३/- जैनोद्दीन अब्बास तडवी, वय ४८ वर्ष, धंदा. शेती, रा. वरील प्रमाणे. ४/- शेखनूर अब्बास तडवी, वय ५७ वर्ष, धंदा. शेती, रा. कवली ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत अब्बास उखडू तडवी हे दि. २४/०७/२०१७ व जैतूनबी अब्बास तडवी हे दि. ०२/०३/२०२३ रोजी मौजे निंबायती, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयत अब्बास उखडू तडवी व जैतूनबी अब्बास तडवी यांचे वारस असुन त्यांना मयत अब्बास उखडू तडवी आणि जैतूनबी अब्बास तडवी यांनी शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि. ०८/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता.२३/१०/२०२६

आदेशावरुन

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १८९/२०२६ नि. क्र.

१/- शरीफ अब्बास तडवी, वय ६० वर्ष, धंदा शेती, रा. निवायती, ता. सोयगाव, जि.छ. संभाजीनगर, २/- सय्यनूर अब्बास तडवी, वय ५९ वर्ष, धंदा. शेती, रा. वारीप्रमाणे. ३/- जैनोद्दीन अब्बास तडवी, वय ४८ वर्ष, धंदा. शेती, रा. वरील प्रमाणे. ४/- शेखनूर अब्बास तडवी, वय ५७ वर्ष, धंदा. शेती, रा. कवली ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत अब्बास उखडू तडवी हे दि. २४/०७/२०१७ व जैतूनबी अब्बास तडवी हे दि. ०२/०३/२०२३ रोजी मौजे निंबायती, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयत अब्बास उखडू तडवी व जैतूनबी अब्बास तडवी यांचे वारस असुन त्यांना मयत अब्बास उखडू तडवी आणि जैतूनबी अब्बास तडवी यांनी शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि. ०८/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता.२३/१०/२०२६

आदेशावरुन,

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

जाहीर प्रगटण / सायटेशन नोटिस

मा. दिवाणी न्यायधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर

सिव्हिल एम ए क्र. 478/2026

अर्जदार :-1) नामदेव कचरू कांगुणे वय 80 वर्षे धंदा शेती रा. सिरजगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

2) सखूबाई गजानन ठोंबरे वय 72 वर्षे धंदा घरकाम रा. हाऊस नं. 16 पाईप लाईन रोड सेल टॅक्स कॉलनी सेवडी रोड नगर अहमदनगर ता. जि. अहमदनगर

विरुद्ध

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट 1827 प्रमाणे वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एस.बी. खाजेकर, रा. गंगापुर जयते यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे ओसने दाखल केला आहे अर्जदार क्र 1हा मयताचा भाऊ आहे वारसदार क्र 2 ही मयताची बहीण आहे. मयत नामे दगडू कचरू कांगुणे हे दिनांक 12/05/2020 रोजी मौजे सिरजगाव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झाले असून मयत दगडू कचरू कांगुणे हे अविवाहीत होते. त्यांना अर्जदार क्र. 1 व 2 हेच कायदेशिर वारसदार आहे. करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहेतमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते त्यअर्थी. की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन 30 दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल प्रकरणात पुढील तारीख 12/10/2026 करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक05/09/2026 रोजी.

कनिष्ठ लिपिक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, गंगापुर

विजया साळुंखे यांना सीओ यांनी कारणे दाखवा नोटीस काढलेली असता परत त्याच्या विरुद्ध महिलांची तक्रार

फुलंब्री तालुक्यातील ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत (उमेद)

फुलंब्री प्रतिनिधी : फुलंब्री तालुक्यातील गनोरी प्रभागातील विजया साळुंखे यांना सीओ यांनी मागील आठवड्यामध्ये कारणे दाखवा नोटीस काढलेली असता त्यात महिलांची भर त्याच्या विरुद्ध महिलांची तक्रार.

गणोरी प्रभागातील कृषी सखी यांना काम का करत नाही याचे खुलासा नोटीस काढलेल्या होत्या त्याचे कारण कि त्यांना नोटीस काढली असल्या कारणांनी त्यांनी कृषी सखी यांना नोटीस काढली होती सी.आर.पी यांना नोटीस न काढण्याचे कारण काही सी.आर.पी फक्त ग्राम संघच्या मिटींगला येतात तरी त्यांना नोटीस नाही कारण काही सी.आर.पी जवळ करतात काही सी.आर.पी च्या माद्यमातून कृषी सखी यांना जाणीव पूर्वक त्रास देतात.

त्यामध्ये दिनांक 2/9/2026 रोजी महिलांना खुलासा द्या असे लेखी स्वरूपात घरून लिहून आणायचे आदेश तालुका व्यवस्थापक काथार यांनी सांगितले होते.महिलांनी आपले म्हणणे लेखी स्वरूपात लिहून आणले होते मात्र ते गणोरी प्रभाग समन्वयक साळुंखे मॅडम व काथार यांनी वाचून महिलांना दबाव आणून ते बदलून घेतले व महिलांकडून महिलांचेच माफी नामे लिहून घेतले.

असे लिहून देत आहे माझी नोकरी घालत आहे का ह्या शब्दांमध्ये महिलांना बोलून त्यांचे खुलासे बदलून घेतले त्यामुळे महिलांनी दिनांक 7/9/2026 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार देऊन आम्हाला आमचे खुलासे मागवले होते त्यामध्ये ते न घेता आमच्यावर दबाव टाकून ते बदलून घेतले महिलांनी त्यांचे खरोखर असलेले खुलासे आम्ही तुमच्याकडे देत आहे अशी तक्रार महिलांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात दिली आहे आम्ही दिलेल्या तक्रारीच्या मुद्या प्रमाणे चौकशी करण्यात यावी सांगण्यात आले सी.ओ. यांनी महिलांना त्या प्रमाणेच चौकशी होईल असे आश्वासन दिले.

गणोरी प्रभाग समन्वयक साळुंखे मॅडम या महिलांना इतरत्र प्रभागातील महिलांसोबत वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत बोलण्यास जेवण्यास तमीज देतात व जर एखादी महिला इतरत्र प्रभागातील महिलांसोबत बोलताना आढळल्यास तिला वैयक्तिक रित्या त्रास दिला जातो

गणोरी प्रभाग समन्वयक या मागील बारा वर्षांपासून गणोरी प्रभागात काम करत असल्यामुळे त्यांचे गणोरी प्रभागावर वर्चस्व निर्माण झाल्याचे महिलांना भासवतात वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुद्धा गणोरी प्रभागांमध्ये येण्यास ही महिला मजल घालते वरिष्ठ अधिकारीही घाबरतात की काय तेही गणोरी प्रभागात फिरकत नाही

वारंवार महिलांना माझ्याविरुद्ध तुम्हाला काही तक्रार करायची असेल तर करा कोणाकडे करायची सीओकडे राजकीय लोकांकडे करा व माझ्या कोणत्याही वरिष्ठाकडे करा माझे त्यांच्यासोबत चांगले संबंध आहेत त्यामुळे ते माझे काहीही करू शकत नाही अशा शब्दांमध्ये महिलांना बोलते व महिलांना धाक दाखवते.

ग्राम संघाच्या मीटिंगमध्ये कृषी सखी यांना बसू द्यायचे नाही असे आदेश सीआरपी यांना गणोरी प्रभाग समन्वयक विजया साळुंखे देतात.

गणोरी प्रभागातील काही दोन ते तीन गावातच प्रभाग सुमनक विजया साळुंखे ह्या जातात काही गावांमध्ये चार ते पाच वर्षांपासून एक किंवा दोनच वेळेस आलेले आहेत मग वरिष्ठ अधिकारी यांना का कामाबद्दल विचारत नाही म्हणजे यामागचे कारण की त्या बारा ते तेरा वर्षांपासून त्याच प्रमाणात काम करत असल्यामुळे त्यांचे त्या प्रभावावर वर्चस्व असल्याची त्या दाखवतात. विशेषता गणोरी प्रभाग सेवन साळुंखे मॅडम या मुख्य अधिकारी यांच्याही आदेशाला न मानता त्या कोणत्याही मीटिंगला उपस्थित राहत नाही व ऑनलाईन मिटिंगला ही अटेंड राहत नाही त्यामुळे त्यांना काही दिवसापूर्वीच कारणे दाखवा असे नोटीस बजावण्यात आली आहे

त्यामध्येच आता परत महिलांनी त्यांच्याविरुद्ध तक्रार दिली आहे

प्रभाग समन्वयक साळुंखे मॅडम यांच्यावर वरिष्ठ अधिकारी कारवाई करतील याकडे सर्व महिलांचे लक्ष लागून आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

अग्रलेख

पुनर्विकासासह नियमांची पुनर्रचनाही हवी

रविवारी दुपारी दिल्ली विद्यापीठाच्या परिसरातील सत्य निकेतनमध्ये विद्यार्थ्यांचे वसतिगृह म्हणून वापरली जाणारी एक जुनी इमारत कोसळली. एकूण पाच मजले असलेल्या या इमारतीच्या तळमजल्यावर दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यादरम्यान एका कॉलमला धक्का लागल्याने ही संपूर्ण इमारतच कोसळल्याचे पोलिसांनी सांगितले. या इमारतीत एकूण पंधरा खोल्या होत्या आणि तिथे प्रत्येकी दोन ते तीन याप्रमाणे जवळपास पन्नास विद्यार्थी राहत होते. रविवारची सुटी असल्याने बहुतांश विद्यार्थी खोल्यांमध्येच होते. अशातच ही दुर्घटना घडली आणि त्यात पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अनेक जण जखमी झाले. पोलिसांनी या इमारतीच्या मालकावर गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. लवकरच तो त्यांच्या हाती लागेलही. पण, जवळपास पन्नास वर्षे जुन्या असलेल्या या इमारतीच्या कोसळण्याने अनेक प्रश्न नव्याने उभे राहिले आहेत. मुळातच सत्य निकेतनमधील ही इमारत इतकी जुनी असतानाही तिचा निवासी स्वरूपाचा वापर कसा काय सुरू होता, हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. या इमारतीला पाच मजले होते, पण बांधकामाची परवानगी केवळ तळमजला आणि एकाच मजल्यासाठी होती, अशी माहिती दिल्ली महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. याचा अर्थ, एवढ्या जुन्या इमारतीमधले वरचे तीन मजले बेकायदा असल्याचे एक तर पालिकेच्या अधिकाऱ्यांना, विशेषतः त्या प्रभागातील कर्मचाऱ्यांना इतके दिवस समजले नाही किंवा त्याकडे सहेतुक दुर्लक्ष करण्यात आले. कारण काहीही असले, तरी यामध्ये ज्या मुलांचा बळी गेला, त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी पाहिलेली स्वप्ने मात्र काही क्षणांत दगड-विटांच्या ढिगाऱ्याखाली कायमची चिरडली गेली. ही दुर्दैवी घटना दिवसाउजेडी घडल्याने किमान लगेच लक्षात आली आणि तिथे वेळेत मदत पोहोचू शकली. ती रात्री घडली असती, तर कदाचित तिची भीषणता आणखी वाढली असती. ही दुर्घटना जिथे घडली, त्या परिसरात अनेक अरुंद गल्ल्या आहेत. त्यामुळे तिथे पोहोचताना मदत आणि बचाव पथकांनाही अडथळ्यांचा सामना करावा लागला. ढिगाऱ्याखाली दबलेले विद्यार्थी मोबाईलवरून इतरांकडे मदतीची याचना करीत होते. त्यापैकी आदित्य नावाच्या कॉमर्सच्या विद्यार्थ्याने ढिगाऱ्याखालून केलेल्या व्हिडीओ कॉलची क्लिप समाजमाध्यमांवर व्हायरलही झाली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने ग्रामीण तसेच निमशहरी भागातील तरुणांचा शहरांकडे ओघ वाढला आहे. तिथे उच्च शिक्षणासोबत नोकरीच्या संधीही मिळत असल्याने साहजिकच मिळेल त्या ठिकाणी आणि अल्प सुविधा असूनही कमीत कमी खर्चात वास्तव्याला प्राधान्य दिले जाते. काही वर्षांचाच काळ काढायचा असल्याने शहरांमध्ये येणारे विद्यार्थी वा नोकरीसाठी स्थलांतरित होणारी कुटुंबे जिथे जागा मिळेल, तिथे बिऱ्हाड थाटतात. पण, अनेकदा त्यांच्या निकडीचा गैरफायदा घेऊन धोकादायक स्थितीतील इमारतींमध्ये जागा दिली जाते. कुटुंब किंवा विद्यार्थी भाडेकरू म्हणून ठेवताना, दुकानांना गाळे भाड्याने देताना संबंधित जागामालक रहिवाशांच्या सुरक्षिततेपेक्षा केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्याचा विचार करताना दिसतात. महानगरात अशा इमारतींमध्ये राहणारे विद्यार्थी अथवा कुटुंब दोन-तीन वर्षांनी जागा बदलतात. त्यामुळे आपली इमारत किती जुनी वा जीर्ण आहे, याची फारशी माहिती कुणी घेत नाही. बहुतांश मोठ्या शहरांमध्ये कमी-अधिक फरकाने हीच स्थिती असते. संबंधित यंत्रणांना न जुमानता आणि बऱ्याचदा त्यांच्या 'अर्थ'पूर्ण दुर्लक्षाने जुन्या, दाट लोकवस्तीच्या भागातील जीर्ण इमारतींचा रहिवासी वापर सुरू राहतो. वास्तविक धोकादायक इमारतींमध्ये कोणत्याही प्रकारे वास्तव्याला प्रतिबंधच असायला हवा. महापालिका अथवा नगरपालिकांकडून संबंधित मालकाला अनेकदा नोटिसा देण्यात येतात. पण, बहुतांश वेळा या सोपस्कारापलीकडे कोणतीही कठोर वा दंडात्मक कारवाई होत नसल्याने त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. परिणामी अशा धोकादायक इमारतींचा वर्षानुवर्षे बिनदिक्कत वापर होत राहतो. पालिका, वीज वितरण कंपनी, वाहतूक पोलिस आणि अन्य यंत्रणांमधील संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रसंगी 'लक्ष्मीदर्शन' घडवून कारवाईची टांगती तलवार आपल्या शिरावर पडणार नाही, याची खबरदारी घेतली जाते. खरे तर, तीन-चार किंवा त्याहून अधिक दशके जुन्या असलेल्या इमारतींचा रहिवासी वापर, त्यातून निर्माण झालेले धोके आणि अशा इमारतींचा पुनर्विकास हा वेगाने नागरीकरण होत असलेल्या सर्वच शहरांसमोरचा मोठा प्रश्न आहे. सर्व इमारतींची अवस्था वाईट नसली तरी बहुतेक जुन्या इमारतींमध्ये सरत्या वर्षागणिक धोक्यांची भर पडतेच. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या महानगरांत गेल्या काही वर्षांमध्ये जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला गती मिळाली आहे. मुंबईत बीडीडी चाळीसारख्या जुन्या इमारतींमधील रहिवाशांना नव्या, भक्कम प्रकल्पांमध्ये हक्काच्या सदनिका देण्यात येत आहेत. तथापि, आजही, विशेषतः पावसाळ्यात एखादी इमारत दुर्घटना तेथे घडते, हे वास्तव आहे. पालिका आणि महापालिका क्षेत्रातील तीस वर्षांपेक्षा जुन्या असलेल्या सर्वच इमारतींचे नियमित स्ट्रक्चरल ऑडिटही व्हायला हवे. या ऑडिटच्या अहवालानुसारच संबंधित इमारत निवासायोग्य आहे की नाही, हे निश्चित केले जावे.

सर्वच मोठ्या शहरांतील अनेक दशकांपूर्वीच्या बहुतांश इमारती त्या काळातील बांधकामाच्या पद्धती आणि दर्जामुळे आता जीर्ण झालेल्या असणे स्वाभाविक आहे. त्यातच अशा अनेक इमारतींच्या आजूबाजूला नव्याने उत्तुंग टॉवर, महाकाय प्रकल्प उभे राहतात. परिणामी या इमारती अंतर्बाह्य धोक्याने वेढलेल्या असतात. भूमिगत जलवाहिन्या आणि गटारी, भुयारी रस्ते, विविध प्रकारच्या केबल्ससाठी लागणारे डक्ट अशा सगळ्या कामांकरिता जमिनीखाली मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जाते. हे करताना खोदकामाच्या ठिकाणापासून विशिष्ट अंतरावरील इमारती, बांधकामांना होणाऱ्या संभाव्य धोक्याचा विचार केला जातो. परंतु, अशा इमारतींचे आयुर्मान विचारात घेऊन त्यांच्या पायापासून ते शेवटच्या मजल्यापर्यंत संपूर्ण स्ट्रक्चरल ऑडिट केले जात नाही. भूमिगत कामे करणारी यंत्रणा आणि संबंधित पालिका केवळ जमिनीवर साकारणाऱ्या प्रकल्पाचा भविष्याच्या दृष्टीने विचार करून त्याप्रमाणे नियोजन करतात. उदाहरणच घ्यायचे, तर तीस वर्षांनंतरच्या लोकसंख्येचा विचार करून भूमिगत मार्ग किंवा मेट्रोची उभारणी होत असेल, तर त्या कालावधीपर्यंत संबंधित मार्गालगत असलेल्या इमारती आणि त्यांचा पाया तेवढाच मजबूत राहील काय, असा दीर्घकालीन विचार होताना दिसत नाही. जुन्या इमारतींचे उभारणीपासूनचे साधारण आयुर्मान, नंतर झालेले अतिरिक्त बांधकाम आणि लगतच्या भागात होणारी जमिनीवरची तसेच भूमिगत कामे यामुळे त्या इमारती नेमक्या कोणत्या स्थितीत आहेत, याचा नगररचना व वास्तुतज्ज्ञांकडून समग्र अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. त्या आधारे संबंधित राज्य शासनाने पालिका क्षेत्रासाठी नवी नियमावली तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. असे झाल्यास संबंधित पालिका आणि यंत्रणांना भविष्यातील धोक्याची माहिती मिळून नव्या बांधकामाच्या किंवा प्रकल्पाच्या आराखड्यातच तशी प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येईल. जुन्या, जीर्ण इमारतींच्या अतिरिक्त, अतिक्रमित बांधकामांवर वेळीच कारवाई आणि त्यांच्या रहिवासी वापराला कठोरपणे प्रतिबंध व्हावा. त्याचप्रमाणे जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासोबतच त्यांच्या वापराबाबत असलेल्या नियमांचीही काळानुरूप पुनर्रचना केल्यास भविष्यात दिल्लीसारख्या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही. ■

आंतरराष्ट्रीय

दहशतवादाचे नवे समुद्री समीकरण

प्रा. जयसिंग यादव

सोमालियामधील जिब्रिल 'वन-आर्म्ड' याह्या अली या व्यक्तीने येमेनमधून लष्करी दर्जाची शस्त्रे मिळवून 'अल-शबाब' या सोमालिअयन अतिरेकी संघटनेपर्यंत पोहोचवली. या व्यवहारात येमेनमधील शस्त्र व्यापाऱ्यांच्या माध्यमातून हुतींकडून शस्त्रे मिळवली गेल्याचा दावा करण्यात आला आहे. ही माहिती बारीक तपशिलानिशी पडताळली जाणे आवश्यक असले, तरी अशा नेटवर्कची शक्यता नाकारता येत नाही. कारण येमेन आणि सोमालिया यांच्यातील समुद्री भौगोलिक जवळीक, अस्थिर राजकीय परिस्थिती आणि दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेली तस्करीची मार्गव्यवस्था यामुळे अशा हालचालींसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. या घटनेतील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दहशतवादाच्या जगात वैचारिक शत्रुत्वापेक्षा व्यावहारिक हितसंबंध वरचढ ठरत आहेत का, हा प्रश्न. हुती हे इराणशी जवळीक असलेले शिया झैदी बंडखोर आहेत, तर 'अल-शबाब' ही सुन्नी कट्टरतावादी आणि 'अल-कायदा'शी संबंधित संघटना आहे. दोन्ही संघटनांच्या विचारसरणीत आणि प्रादेशिक उद्दिष्टांमध्ये मूलभूत फरक आहे. यापूर्वी 'अल-कायदा' आणि हुती यांच्यात संघर्षही झाला आहे. त्यामुळे या दोन्हींचे संबंध एखाद्या औपचारिक दहशतवादी आघाडीच्या स्वरूपात आहेत, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल; मात्र दहशतवादी संघटनांना कायमस्वरूपी मित्र नसतात. त्यांचे व्यवहार प्रामुख्याने हितसंबंधांवर आधारित असतात. शस्त्रांची गरज असलेल्या संघटनेला शस्त्रे मिळत असतील आणि शस्त्रपुरवठा करणाऱ्या घटकाला त्यातून पैसा, प्रभाव किंवा नवीन भौगोलिक संपर्क मिळत असेल, तर वैचारिक मतभेद तात्पुरते बाजूला ठेवले जाऊ शकतात. याच कारणामुळे 'हुती-अल-शबाब' संपर्काची शक्यता गंभीरपणे तपासण्याची गरज आहे.

'अल-शबाब'कडे मनुष्यबळ, आर्थिक स्रोत आणि सोमालियातील काही भागांमध्ये प्रभाव आहे; परंतु आधुनिक लष्करी तंत्रज्ञान, अचूक लक्ष्यभेदी क्षमता, ड्रोनविरोधी साधने, प्रगत संप्रेषण व्यवस्था आणि आधुनिक शस्त्रास्त्रे यांची त्याला सातत्याने गरज भासते. दुसरीकडे, हुतींनी गेल्या काही वर्षांमध्ये क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि इतर आधुनिक लष्करी साधनांचा वापर करून आपली क्षमता लक्षणीयरीत्या वाढवली आहे. येमेनमधील संघर्षामुळे तयार झालेल्या शस्त्रांच्या बाजारपेठा, तस्करीचे मार्ग आणि मध्यस्थांचे जाळे या परिस्थितीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. अशा परिस्थितीत एखादा मध्यस्थ दोन्ही बाजूंच्या गरजा जोडत असेल, तर त्यातून निर्माण होणारे नेटवर्क एखाद्या औपचारिक संघटनेपेक्षा अधिक धोकादायक ठरू शकते. कारण त्याला एका ठरावीक कराराची किंवा संयुक्त नेतृत्वाची आवश्यकता नसते.

पैसा, शस्त्रे आणि माहिती यांची देवाणघेवाण करणारे छोटे-छोटे घटक स्वतंत्रपणे काम करू शकतात. हीच बाब सुरक्षा यंत्रणांसाठी आव्हानात्मक आहे. दहशतवादी नेटवर्कची पारंपरिक कल्पना म्हणजे एका संघटनेचे नेतृत्व, त्याखालील सदस्य आणि त्यांच्यातील स्पष्ट आदेशसाखळी; परंतु आधुनिक काळातील दहशतवाद अधिक विकेंद्रित होत आहे. शस्त्रतस्कर, स्थानिक गुन्हेगारी टोळ्या, बनावट कंपन्या, समुद्री तस्करीचे मार्ग आणि डिजिटल आर्थिक व्यवहार यांचा वापर करून विविध संघटना एकमेकांशी जोडल्या जाऊ शकतात. या प्रकरणाचे गांभीर्य समजून घेण्यासाठी लाल समुद्र आणि एडनच्या आखाताचे सामरिक महत्त्व लक्षात घ्यावे लागेल.

युरोप आणि आशियामधील समुद्री व्यापारासाठी हा प्रदेश अत्यंत महत्त्वाचा आहे. सुएझ कालवा, बाब-अल-मंदेब सामुद्रधुनी आणि एडनचे आखात हे जागतिक व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे मार्ग आहेत. येमेनच्या किनाऱ्यावर हुतींचा प्रभाव आणि सोमालियाच्या किनाऱ्यावर 'अल-शबाब'ची उपस्थिती यामुळे या संपूर्ण समुद्री पट्ट्यात अस्थिरतेची अनेक केंद्रे आधीपासून अस्तित्वात आहेत.

त्यात शस्त्रतस्करी, दहशतवादी संपर्क आणि समुद्री नेटवर्क यांची भर पडली, तर परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होऊ शकते. याचा परिणाम केवळ स्थानिक सुरक्षेवर होणार नाही. व्यापारी जहाजांना वाढता धोका निर्माण झाल्यास विमा खर्च वाढतो, जहाजांना पर्यायी मार्ग स्वीकारावे लागतात आणि वाहतूक खर्च वाढतो. परिणामी, जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे लाल समुद्रातील दहशतवादी अस्थिरता ही शेवटी जागतिक अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचणारी समस्या आहे. येमेन आणि सोमालिया यांच्यामधील समुद्री परिसराचा वापर तस्करीसाठी होण्याची शक्यता नवी नाही. या भागात शस्त्रे, अमली पदार्थ, मानवी तस्करी आणि इतर बेकायदेशीर व्यापाराचे मार्ग पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. दहशतवादी संघटनांना या मार्गांचा उपयोग मिळाला, तर केवळ शस्त्रेच नव्हे, तर पैसा, माहिती आणि मनुष्यबळाची वाहतूक करण्याचीही संधी मिळू शकते. यामुळे समुद्री सुरक्षेचा प्रश्न अधिक व्यापकपणे पाहण्याची गरज आहे.

या प्रश्नावर उत्तर शोधताना केवळ युद्धनौका तैनात करून समस्या सुटणार नाही. बंदरांवर देखरेख, संशयास्पद आर्थिक व्यवहारांचे परीक्षण, जहाजांच्या हालचालींचे निरीक्षण, किनारपट्टीवरील स्थानिक यंत्रणांशी समन्वय आणि आंतरराष्ट्रीय गुप्तचर सहकार्य यांना समान महत्त्व द्यावे लागेल.

या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची सावधगिरी आवश्यक आहे. हुती आणि 'अल-कायदा' यांच्यातील संबंधांकडे पाहताना त्यांच्यातील वैचारिक संघर्ष दुर्लक्षित करता कामा नये. केवळ काही शस्त्रव्यवहार किंवा मध्यस्थांमधील संपर्क आढळला म्हणून दोन्ही संघटनांनी औपचारिक युती केली आहे, असे म्हणणे अचूक ठरणार नाही; परंतु याउलट होणारी चूकही टाळली पाहिजे. वैचारिक मतभेद आहेत म्हणून कोणतेही व्यवहार्य सहकार्य होणारच नाही, असे मानणेही धोकादायक आहे. दहशतवादी संघटना आपल्या अस्तित्वासाठी आणि क्षमतेसाठी आवश्यक असलेले संसाधन मिळवताना अनेकदा तात्कालिक तडजोडी करतात. त्यामुळे प्रश्न 'युती झाली आहे का?' एवढाच नसून 'कोणत्या पातळीवर, कोणत्या माध्यमातून आणि कोणत्या उद्देशाने संपर्क होत आहे?' हा असायला हवा. लाल समुद्र आणि एडनचे आखात भारतासाठी विशेष महत्त्वाचे आहेत. भारताचा मोठा परदेशी व्यापार समुद्री मार्गांवर अवलंबून आहे. पश्चिम आशिया, आफ्रिका आणि युरोपशी जोडणाऱ्या समुद्री मार्गांमध्ये या प्रदेशाचे स्थान महत्त्वाचे आहे. भारतीय जहाजवाहतूक, ऊर्जा आयात, निर्यातदार आणि परदेशात काम करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही या परिसरातील स्थैर्य आवश्यक आहे.

या पृष्ठभूमीवर भारताने या घडामोडीकडे केवळ पश्चिम आशियातील संघर्षाच्या चौकटीत न पाहता हिंद महासागराच्या व्यापक सुरक्षेच्या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. समुद्री गुप्तचर व्यवस्था अधिक सक्षम करणे, मित्रदेशांशी माहितीची देवाणघेवाण वाढवणे आणि पूर्व आफ्रिका-लाल समुद्र क्षेत्रातील सुरक्षा सहकार्य मजबूत करणे ही काळाची गरज आहे. विशेषतः दहशतवादी नेटवर्क आणि समुद्री गुन्हेगारी नेटवर्क यांच्यातील संभाव्य संबंधांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेली शस्त्रांची उपलब्धता आणि संस्थात्मक पोकळी दहशतवादी नेटवर्कसाठी पोषक वातावरण तयार करते. त्यामुळे संघर्षाचे राजकीय समाधान आणि प्रादेशिक स्थैर्य हे दहशतवादविरोधी धोरणाचा अविभाज्य भाग असले पाहिजे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

वेध

नितीन शिरसाट

पेपरफुटीने विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात

महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही राज्यातील अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे. राज्य प्रशासनासाठी अधिकारी निवडण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून होते. त्यामुळे या परीक्षेची विश्वासार्हता म्हणजे केवळ एका संस्थेची प्रतिष्ठा नव्हे ती राज्याच्या प्रशासनाच्या गुणवत्तेशी जोडलेली बाब आहे. औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीच्या आरोपानंतर पुण्यात व कोल्हापुरात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलन केले. महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात विविध भरती व पात्रता परीक्षांमध्ये झालेले गैरप्रकार, पेपरफुटीचे आरोप, परीक्षांतील त्रुटी आणि त्यानंतर विद्यार्थी आंदोलने यामुळे एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. परीक्षा यंत्रणा विद्यार्थ्यांची परीक्षा घेत आहे की काय, हा खरा प्रश्न आहे. आज एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीने राज्याला धक्का बसला आहे. या प्रकरणात तपास पुढे जात असून अटकसत्रही झाले आहे. काही संशयितांमध्ये आयोगाशी संबंधित व्यक्तींचाही समावेश असल्याचे तपासातून समोर आले आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ बाहेरच्या दलालांचा आहे की परीक्षा व्यवस्थेच्या आतील काही दुवेही त्यात सहभागी आहेत हा प्रश्न तपास यंत्रणांनी शेवटपर्यंत नेणे आवश्यक आहे.

प्रश्नपत्रिका छपाईपासून ती परीक्षार्थींच्या हातात पोहोचेपर्यंत अनेक टप्पे असतात. प्रश्ननिर्मिती, प्रश्नपत्रिकेची निवड, छपाई, पॅकिंग, वाहतूक, सुरक्षित साठवण, परीक्षा केंद्रांवर वितरण आणि परीक्षा सुरू होईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर गोपनीयता आणि सुरक्षा अत्यावश्यक आहे. यापैकी एका टप्प्यावरही गैरप्रकार झाला तर संपूर्ण परीक्षा धोक्यात येऊ शकते. प्रश्नपत्रिका फुटते तेव्हा केवळ एक परीक्षा रद्द होत नाही तर एका पिढीच्या कष्टांवरील विश्वासाला तडा जातो. स्पर्धा परीक्षा म्हणजे लाखो तरुणांच्या आयुष्याचे प्रवेशद्वार असते. एखाद्या सरकारी नोकरीसाठी एखादा तरुण दोन-तीन वर्षे अभ्यास करतो.

गावाकडच्या छोट्याशा घरात राहून, शेतमजुरी किंवा छोटी-मोठी कामे करून, आई-वडिलांच्या कष्टाच्या पैशातून पुस्तके घेतो, शिकवणी वर्ग लावतो, ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शहरात येऊन खोली भाड्याने घेतो. अभ्यासिकेमध्ये पैसे भरून दहा-बारा तास अभ्यास करतो. काही जण तर नोकरी, संसार आणि जबाबदाऱ्या सांभाळून स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. त्यांच्या या कष्टाचे अंतिम मूल्यमापन काही तासांच्या परीक्षेत होते. मात्र त्या परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका काहींच्या हातात पोहोचली तर मग परीक्षागृहात बसलेला प्रामाणिक विद्यार्थी आणि प्रश्नपत्रिका आधीच मिळवून बसलेला विद्यार्थी यांच्यात स्पर्धा कशी राहणार? ही स्पर्धा राहत नाही. हा शिक्षण व्यवस्थेचा पराभव असतो. प्रश्नपत्रिका फुटणे म्हणजे मेहनती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर केलेला संघटित हल्ला असतो. 'नीट'च्या पेपरफूट प्रकरणात एका शिकवणी वर्गाच्या प्रमुखाचा मुलगा परीक्षा देत असल्याने हा पेपर परीक्षेपूर्वीच लाखो रुपये देऊन विकत घेणाऱ्यांच्या हातात पडला. परिणामी परीक्षा रद्द झाली. मेहनत करून जिद्द, चिकाटीने स्वाभिमान जागृत ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. या घटनेनंतर पुन्हा एकदा राज्यभरातील एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या संतापाचा आक्रोश झाला आहे. आज हा आक्रोश पुण्यापासून कोल्हापूरपर्यंत दिसून येत आहे. पुण्यामध्ये हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. हजारो विद्यार्थ्यांनी एकत्र येत ११ मागण्या सरकारसमोर ठेवल्या आहेत. स्पर्धा परीक्षा अतिशय पारदर्शी पद्धतीने पार पाडण्यासाठी सरकार सातत्याने काम करते आहे. ही प्रक्रिया अधिक कशी मजबूत करता येईल यासाठी राज्यस्तरावर एक उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. पेपरफुटीविरोधातील आंदोलनांमध्ये अनेक संघटना सहभागी झाल्या आहेत. त्यांनी त्याविरुद्ध आवाज उठवला आहे. कोणती संघटना कोणत्या विचारसरणीची आहे, यापेक्षा तिने उपस्थित केलेल्या प्रश्नाची सत्यता काय आहे, हे तपासणे महत्त्वाचे आहे. पेपरफुटीने अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जात आहे. पेपरफुटीच्या घटनांना वेळी आळा घालणे आणि परीक्षार्थींचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास दृढ करणे आवश्यक आहे. ■

९८८१७१७८२८

इतस्ततः

लघुउद्योगांची चौकट विस्तारताना

दत्तात्रेय आंबुलकर

नुकत्याच संपलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सुरुवातीपासून अगदी अधिवेशन संपेपर्यंत विरोधी पक्षांनी गोंधळ घातला. त्यामुळे याच गोंधळाच्या पृष्ठभूमीवर, काही पारित झालेल्या विधेयकांकडे दुर्लक्ष झाले. यापैकी एक म्हणजेच एमएसएमई (विकास) विधेयक २०२६ होय!

विरोधकांच्या गोंधळाचा फटका या पारित झालेल्या महत्त्वपूर्ण विधेयकालाही बसला आणि त्याकडे स्वाभाविकपणेच दुर्लक्ष झाले. २००६ मध्ये पारित झालेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास कायद्याच्या अंमलबजावणीला यंदा २० वर्षे पूर्ण झालीत. या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारच्या पुढाकाराने, पारित झालेल्या एमएसएमई कायद्यातील नव्या तरतुदींचे महत्त्व अधिकच वाढते.

या साऱ्या वैधानिक प्रक्रियेची व्यावसायिक पृष्ठभूमी म्हणजे, गेल्या दोन दशकांमध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग आणि उद्योजकांमध्ये मोठे बदल घडून आले आहेत. त्याचाच प्रत्यय आज सर्वदूर येत आहे. एमएसएमई क्षेत्रात आजवरच्या बदलांचे परिणाम म्हणजे, एप्रिल २०२३ मध्ये उद्यम नोंदणीअंतर्गत एमएसएमई उद्योगांची संख्या १.६५ कोटींवरून, एप्रिल २०२६ मध्ये ९.१६ कोटींवर गेली. या लघु उद्योगांच्या माध्यमातूनच, देशात सुमारे ४० कोटी रोजगार उपलब्ध झाले असून, त्याचे प्रमाण सातत्याने वाढतेच आहे. याचेच सकारात्मक परिणामही एकूणच अर्थव्यवस्थेवर दिसून येत आहेत. या बदलत्या पृष्ठभूमीवर सरकारने एमएसएमई क्षेत्रातील लघुउद्योगांच्या कार्यप्रणालीत सुधारणांसाठी आणि सुलभीकरणासाठी, यावेळी खालील सुधारणा केल्या आहेत :

व्यावसायिक परिस्थितीनुसार लघुउद्योगांना चालना देणे : नव्या नियमानुसार एमएसएमई क्षेत्रातील उद्योग-व्यवसायाचे वर्गीकरण आता, कारखान्यातील मशिनरीसाठीची गुंतवणूक व उलाढाल या निकषांवर करण्यावर भर असणार आहे. याशिवाय, उद्यम प्रणालीअंतर्गत एमएसएमईची संगणकीय नोंदणीही ऐच्छिक व निःशुल्क राहणार आहे.

एमएसएमईची देयके व रक्कम वेळेत मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा व पद्धती : या नव्या प्रणालीअंतर्गत, एमएसएमई उद्योगांना, त्यांच्या देयकासंबंधीचे वाद संगणकीय पद्धतीने सोडवून घेण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे लघुउद्योजकांच्या वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. याशिवाय, देयकाच्या रकमेशी संबंधित विवाद सहा महिन्यांहून अधिक काळासाठी प्रलंबित असल्यास, विवादित रकमेच्या अर्धी रक्कम संबंधित न्यायासन देऊ शकेल, अशी तरतूदही करण्यात आली आहे.

प्रलंबित विवादित देयकांची प्रकरणे तातडीने निकाली काढणे : सार्वजनिक क्षेत्रातील सर्व आस्थापनांना, त्यांच्या देयक प्रक्रियेसाठी एमएसएमई उद्योगांसाठी ट्रेड रिसिव्हेबल्स डिस्काऊंटिंग सिस्टम प्लॅटफॉर्म (ट्रेड्स) पद्धतीचा वापर अनिवार्य करण्यात आला. राज्य सरकारांनीही याचाच वापर राज्यस्तरीय सार्वजनिक उद्योगांसाठी तरतूद नव्या कायद्यात आहे. उपलब्ध माहितीनुसार, एमएसएमई क्षेत्रात ट्रेड्सद्वारा, २०२२-२३ मध्ये ४० हजार कोटी रुपयांची देयके देण्यात आली. ही उलाढाल २०२५-२६ मध्ये ३.४७ लाख कोटींवर पोहोचली आहे.

राज्यस्तरावर एमएसएमई समन्वय मंडळांची निर्मिती करणे : कायद्यातील नवीन तरतुदींनुसार, नव्याने लवचीक व व्यवसायपूरक अशा एमएसएमई क्षेत्रातील उद्योगांत समन्वय साधण्याचे काम करण्यासाठी, मायक्रो अॅण्ड स्मॉल एंटरप्राइज फॅलिसिटेशन सेंटर (एमएसईएफसी)ची स्थापना करण्यासाठी राज्यांनी पुढाकार घ्यावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. यामुळे एमएसएमई क्षेत्रातील उद्योग व उद्योजकांचे प्रश्न जलद मार्गी लागतील अशी अपेक्षा आहे. या समन्वय केंद्राच्या कार्यकक्षेत एमएसएमई उद्योगांची प्रलंबित देयके व त्याच्याशी संबंधित मुद्द्यांचाही समावेश आहे. नव्या कायद्यातील राज्यस्तरीय तरतुदी अधिक उपयुक्त, परिणामकारक व एमएसएमई क्षेत्राला पूरक ठराव्यात, यासाठी राज्य सरकारांना प्रशासनिक व वैधानिक स्वायत्तताही प्रदान करण्यात आली आहे.

एमएसएमईसाठी सुलभ आणि व्यावसायिक विश्वासाचे वातावरण प्रदान करणे : नव्या तरतुदींनुसार, विशिष्ट तरतुदींचे पालन न झाल्यास घेण्यात येणारी कठोर भूमिका व त्यानुसार करण्यात येणाऱ्या कारवाईला सौम्य स्वरूप देण्याची भूमिका महत्त्वाची. यापूर्वी, कायदेशीर तरतुदींची पूर्तता न झाल्यास दंड व दिवाणी शिक्षेची तरतूद होती. यासंदर्भात अपेक्षित नोंदणी न होणे अथवा संबंधित माहिती विशिष्ट कालावधीत न भरण्यासारख्या प्रकारांसाठीही एमएसएमई कायद्यात दुहेरी दंडात्मक तरतुदी होत्या. यावर नव्या सुधारणांमध्ये दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

नवीन तरतुदीनुसार, एमएसएमई व लघुउद्योजकांच्या संदर्भात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ अपूर्ण वा चुकीची माहिती वा तपशील सादर केल्यास, अशा प्रकरणी पहिल्या वेळेस संबंधित लघुउद्योजकाला समज देऊन सुधारण्याची संधी दिली जाणार आहे. त्यानंतर असाच प्रकार पुन्हा आढळल्यास, अशा लघुउद्योजकावर दंडात्मक कारवाईचा बडगा उचलला जाण्याची तरतूदही करण्यात आली आहे. अशाच प्रकारच्या तरतुदींचा अवलंब लघुउद्योजकांना देय असणाऱ्या देयकांची बाकी रक्कम व त्यावरील देय व्याजाचे तपशील, आपल्या वार्षिक व्यवसाय विवरणपत्रात नमूद न करणाऱ्या व्यावसायिकाला आधी समज व नंतर दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. याचाही सकारात्मक परिणाम एमएसएमईच्या आर्थिक उलाढालीवर होणे अपेक्षित आहे. या संदर्भातल्या नव्या कायदेशीर तरतुदी व धोरणात्मक निर्णयांमुळे, एमएसएमई क्षेत्रात विश्वासाची भावना वाढीस लागेल. तसेच, लघुउद्योग क्षेत्रातील वाढता व्यवसाय लक्षात घेता, या उद्योग क्षेत्राशी संबंधित सर्व उद्योगांमध्ये परस्पर सहकार्यही वाढण्याचा विश्वास यानिमित्ताने सरकारतर्फे व्यक्तकरण्यात आला आहे. ■

९८२२८४७८८६

(लेखक एचआर व्यवस्थापक आणि सल्लागार आहेत.)

वाचक पत्रे

सहजीवनाची आवश्यकता

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सर्वसमावेशक आणि लवचीक आहे. भेदविरहित, एकसंध व चारित्र्यसंपन्न समाजरचना तयार करणे हे संघाचे ध्येय आहे. त्यासाठीच संघाने मुस्लिम राष्ट्रीय मंच यासह विविध आयाम दिले आहेत. संघ शाखेवर रोज एकात्मता स्तोत्र आणि मंत्र म्हटला जातो. त्यात जैन, बुद्ध, शीख, शैव, शिव आणि वैष्णव या सर्वांना नमन केले जाते. समरसतेशिवाय समता निर्माण होऊ शकणार नाही आणि दोन्ही नसेल तर आपण राष्ट्रीयतेची कल्पना करू शकणार नाही. कोणत्याही व्यक्तीचा परिचय झाल्यावर आपल्या मनात तो कोणत्या जाती, धर्माचा आणि वर्गाचा आहे असा विचार येणे हे खुजेपणाचे लक्षण आहे. माणसाने माणसाकडे माणूस म्हणूनच पाहिले पाहिजे.

मात्र, यातले वास्तव असे की, फक्त हिंदू समाजाला सांगून भाईचारा निर्माण होणार नाही. तर इतर सर्व समुदायांना सोबत यावे लागेल. गेल्या दोन-तीन दशकांत मतांसाठी तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे मुख्यतः समाजा-समाजात दरी निर्माण झाली आहे. सर्व प्रकारचा जिहाद सुरू आहे. शत्रुता, कटुता, अविश्वास वाढला आहे. आज खऱ्या अर्थाने 'हिंदू मुस्लिम शीख इसाई, हम सब भाई भाई' या भावनेसह सहजीवनाची आवश्यकता आहे.

राष्ट्रवादी मताचे मुसलमान आणि ख्रिश्चन यांना स्वयंसेवक आनंदाने स्वीकारतील. फक्त एका अटीवर की, त्यांनी हिंदूंचे धर्मांतरण आणि लव्ह जिहाद किंवा कोणत्याही प्रकारचा जिहाद करू नये. घर वापसीला विरोध करू नये. हे शक्य आहे की नाही हे त्यांच्या प्रतिसादावर अवलंबून आहे. सकारात्मक प्रतिसाद मिळण्यासाठी आशावादी राहून त्यांच्याशी मैत्रीपूर्ण व्यवहार ठेवून प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने कार्य करणे आवश्यक आहे.

प्रदीप गडकरी/९८२२४७३२२१

■■

दहीहंडी : एक साहसी व कलात्मक उत्सव

दहीहंडी उत्सव म्हणजे एकत्र जमणाऱ्या सर्व गोविंदांचा एक सामाजिक, साहसी व कलात्मक उत्सव होय. महाराष्ट्र शासनाने दहीहंडी उत्सव शासनाच्या साहसी खेळामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय यातच या उत्सवाचे महत्त्व दिसून येते. भगवान श्रीकृष्ण यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ही सर्व गोविंदा मंडळी समाजात विधायक, रचनात्मक व श्रद्धेचा पाया रचून न्याय कार्यासाठी आपली कला, कौशल्य व साहसाचे प्रात्यक्षिक दाखवून समाजाला योग्य व सकारात्मक दिशा दर्शविण्याचे उपक्रम राबविते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या दहीहंडी उत्सवातून समाजातील विविध थरातील युवक एकत्र येतात, हे सामाजिक ऐक्याचे प्रतीक आहे. वेगवेगळ्या विचार व संप्रदायांचे युवक एकत्र येणे म्हणजे सामाजिक ऐक्याचे दर्शन होय. सामाजिक संघटितपणा दहीहंडी उपक्रमातून दिसून येतो. या दहीहंडी उपक्रमातून

गोविंदांच्या कला, कौशल्य, संयम, सहकार्य व समन्वयाचे दर्शन घडते. दहीहंडीचे मनोरे सामाजिक ऐक्याचे

प्रतीक होय. गोविंदांचा प्रचंड आत्मविश्वास बळावणारा हा उत्सव होय. अत्यंत संयमाने गोविंदा मनोरे उभारतात. एकावर एक उभे राहून हंडीपर्यंत गोविंदा पोहचतो व हंडी फोडतो. हे प्रचंड साहस व आत्मविश्वासाचे लक्षण आहे.

''एकमेका साहाय्य करू-अवघे धरू सुपंथ'' असा संदेश देणारा हा उत्सव होय. दहीहंडीतून साहस, धाडस, धीरोदात्तपणा व विश्वास यासारखे गुण जोपासले जातात. हा उपक्रम भगवान श्रीकृष्ण यांच्या सर्वगुणसंपन्नतेचा आदर व सन्मान करणारा उत्सव होय. गोविंदांनी दहीहंडी उत्सव साजरा करीत असताना आपली सर्वांची काळजी घेणे गरजेचे आहे. प्रेक्षकांनी शांतता व संयम बाळगावा. सहभागी गोविंदांनी उत्सवास साजेशी भूमिका पार पाडल्यास दहीहंडीचा आनंद द्विगुणित होतो.

धोंडीरामसिंह राजपूत/९४२१३१२२४४

■■

बडनेरा-नाशिक मेमू रद्द करू नये

जळगाव आणि शिरसोली दरम्यान रुळांच्या दुरुस्तीमुळे, भुसावळ रेल्वे विभागाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी होणारी ६११२९/६११३० बडनेरा-नाशिक रोड-बडनेरा मेमू ट्रेन रद्द केली आहे. प्रवाशांना होणारा त्रास टाळण्यासाठी, ही मेमू ट्रेन पूर्णपणे रद्द करण्याऐवजी थोड्या अंतरावरच थांबवावी, अशी रेल्वे प्रवाशांची मागणी आहे. रेल्वे विभाग या मागणीकडे लक्ष देईल, अशी आशा आहे. ■

राजेश कारिया/अकोला

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सण, उत्सव शांततेत साजरे करा जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत सूचना

उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ सप्टेंबर

जिल्ह्यात सण, उत्सव साजरे करताना सामाजिक सलोखा, शांतता आणि स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा-२०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी गणेश मंडळांनी परिसराच्या स्वच्छतेसह विविध सामाजिक व विधायक उपक्रमांचे प्रभावीपणे आयोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

गणेश मंडळांनी शासनाच्या पोर्टलवर आवश्यक नोंदणी करूनच गणेशोत्सवाचे आयोजन करावे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, नियमित विद्युत पुरवठा, नालेसफाई तसेच नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील, असेही जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात गणेशोत्सव व आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलीस अधीक्षक शेणिक लोढा, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, सर्व तालुक्यांतील पोलीस अधिकारी, शांतता समितीचे सदस्य, पोलीस पाटील, गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

गणेश मंडळांनी शासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करून शांततेत व उत्साहात गणेशोत्सव साजरा करावा. मंडळाची अधिकृत नोंदणी करून अधिकृत वीज जोडणी घ्यावी. विद्युत रोषणाईसाठी आवश्यक प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. तसेच आग प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात. गणेश विसर्जन व मिरवणुकीतील वाहनांची प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत तपासणी तसेच वाहनचालकांची आरोग्य तपासणी करून त्याबाबतची आवश्यक माहिती पोलीस विभागाला द्यावी, असे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी सांगितले.

गणेशोत्सवाच्या मिरवणुकीदरम्यान कोणत्याही व्यक्तीच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची मंडळांनी दक्षता घ्यावी. मिरवणूक शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडाव्यात. मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी तसेच आवश्यक प्रमाणपत्रांची माहिती पोलीस विभागाला उपलब्ध करून द्यावी. ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरुस्ती तसेच रस्त्यांवरील विद्युत दिवे सुरू राहतील, याबाबत संबंधित यंत्रणांकडून दक्षता घेतली जाईल, असेही गायकवाड म्हणाले.

जिल्ह्यात यावर्षी एक हजार ४८९ गणेश मंडळांची स्थापना होणार असून, अनेक गावांमध्ये पोळा सण साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्व धर्मीयांमध्ये एकोपा व सामाजिक सलोखा कायम ठेवत सण, उत्सव उत्साहात आणि शांततेत साजरे करावेत, असे पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा यांनी सांगितले.

गणेशोत्सव हा लोकसंस्कृती व परंपरांचे जतन करणारा उत्सव आहे. त्यामुळे निसर्गाची व पर्यावरणाची हानी होणार नाही, तसेच सामाजिक सलोख्याला बाधा येणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करण्यास प्राधान्य द्यावे. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निर्देशांसह शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस अधीक्षक लोढा यांनी दिला.

सण, उत्सवांच्या काळात गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सांस्कृतिक नेतृत्वाची भूमिका बजावत असतात. त्यामुळे सामाजिक शांतता, पर्यावरण आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन होईल, यासाठी सर्वांनी जबाबदारीने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, जेष्ठ पत्रकार नंदकुमार तोष्णीवाल, डॉ.सतीश पाचपुते, मधुकर मांजरमकर आदींनी त्यांच्या भावना मांडल्या. गणेश समितीच्या मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आदींच्या अडचणी, समस्या यावेळी जाणून घेतल्या.

हत्ता येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्त्याचे भूमीपूजन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ सप्टेंबर

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाला आणि ग्रामीण पायाभूत सुविधांना गती देण्यासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' (सन २०२६-२७) अंतर्गत हिंगोली विधानसभा मतदारसंघातील सेनगाव तालुक्यातील हत्ता येथे पाणंद रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन गावकऱ्यांच्या व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.

या योजनेअंतर्गत हत्ता गावातील भागोजी दळवी यांच्या शेतापासून ते महादू मोटे यांच्या शेतापर्यंत जाणाऱ्या पाणंद रस्त्याचे पक्के काम हाती घेण्यात आले आहे. या महत्त्वाच्या रस्त्यामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायदा होणार आहे. सुरक्षित व अखंडित वाहतूक: पावसाळ्यात चिखल आणि खडतर वाट्यांमुळे होणारी अडचण दूर होऊन शेतकऱ्यांना शेतापर्यंत सुरक्षित, सुलभ आणि १२ महिने अखंडित वाहतुकीची सुविधा मिळेल. शेतीमाल वेळेवर आणि विनाअडथळा मुख्य बाजारापर्यंत पोहोचवणे शक्य होईल, ज्यामुळे उत्पादनाला योग्य भाव मिळण्यास मदत होईल. वाहतुकीचा वेळ व खर्च वाचल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल आणि ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. ग्रामीण भागाचा कायापालट करणाऱ्या या कार्यक्रमास भाजपा युवा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे, माणिक लोडे, श्रीरंग राठोड यांच्यासह परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील रस्ते सक्षम करणे हा शेती विकासाचा पाया असून, शासन शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी आणि त्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचा सूर यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

हिंगोली पंचायत समितीमध्ये घरकुल लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणुक?

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ सप्टेंबर

येथील पंचायत समिती कार्यालयात सध्या घरकुल लाभार्थ्यांना घरकुलासाठी मिळणाऱ्या अनुदानाचा शेवटचा धनादेश वाटप करण्यात येत आहे परंतु यासाठी गोरगरीब लाभार्थ्यांना चकरा माराव्या लागत आहेत. काही रोजगारसेवक, ग्रामसेवक, अभियंता आणि सरपंच त्यांचा खिसा गरम केल्याशिवाय धनादेश काढीत नसल्याची तक्रार लाभार्थी करीत असतांना दिसत आहेत.

ग्रामीण भागात पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले. लाभार्थ्यांची निवड करण्यापासून ते त्यांना घरकुलाचा अंतिम धनादेश मिळेपर्यंत तारेवरची कसरत करावी लागत आहेत. प्रथम लाभार्थ्यांची निवड करतांना लाभार्थ्यांना चिरीमिरी दिल्याशिवाय यादीत नाव समाविष्ट केल्या जात नाही. यामध्ये रोजगारसेवकांसह ग्रामसेवक, सरपंच आणि पंचायत समितीतील कर्मचारी यांचा सहभाग असतो. त्यानंतर अनुदानाचा धनादेश काढण्यासाठी हिंगोली पंचायत समितीला चकरा माराव्या लागतात. ये-जा करण्यात वेळ आणि पैसा खर्च करावा लागत आहे. सध्या घरकुल अनुदानाचा शेवटचा धनादेश वाटप चालू असून यासाठी लाभार्थी मोठ्या संख्येने पंचायत समिती कार्यालयात येत आहेत. परंतु याठिकाणी संबंधितांचे खिसे गरम केल्याशिवाय धनादेश वाटप करण्यात येत नसल्याची तक्रार काही लाभार्थी करीत आहेत.

हिंगोली- हिंगोली पंचायत समिती कार्यालयात सध्या घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना शेवटच्या अनुदानाचे धनादेश वाटप करण्यात येत आहेत. यासाठी मोठ्या संख्येने लाभार्थ्यांनी पंचायत समिती कार्यालयात गर्दी केलेली दिसत आहे. छाया- लखन यादव

संक्षिप्त वृत्त

हिंगोली तालुक्यातील आज १११ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित होणार

हिंगोली- जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार हिंगोली तालुक्यातील १११ ग्राम पंचायतींमधील सरपंच पदे सन २०२५-२०३० या कालावधीसाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच महिला (नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांसह) प्रवर्गासाठी आरक्षित करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत. या अनुषंगाने अधिसूचनेच्या अनुसूची-२ नुसार हिंगोली तालुक्यातील १११ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांचे निश्चित संख्येप्रमाणे आरक्षण थेट/चिठ्ठी सोडत पद्धतीने सर्वांसमक्ष निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली येथील सभागृहात सभा आयोजित करण्यात आली आहे. हिंगोली तालुक्यातील १११ ग्रामपंचायतींच्या सर्व नागरिकांनी या सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार, हिंगोली यांनी केले आहे.

हिंगोली तालुक्यातील युवक-युवतीसाठी मोफत डीटीपी प्रशिक्षण, १२ सप्टेंबरपर्यंत नाव नोंदणी

हिंगोली- जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली पुरस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली तालुक्यातील सर्वसाधारण प्रवर्गातील युवक-युवतींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी किमान ८ वी उत्तीर्ण असणे आवश्यक असून, त्यांचे वय १८ ते ४५ वर्षे दरम्यान असावे. प्रशिक्षणासाठी इच्छुक उमेदवारांनी नाव नोंदणी करताना आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो, टी.सी. व बँक पासबुक यांची आवश्यक कागदपत्रे जमा करावीत. नाव नोंदणीची अंतिम मुदत १२ सप्टेंबर २०२६ आहे. इच्छुक युवक-युवतींनी विहित मुदतीत नाव नोंदणी करून या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी विकास उंडाळ, कार्यक्रम आयोजक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, हिंगोली (मो. ८४१२०८९२७२) यांच्याशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपर्क करता येईल. या प्रशिक्षणाच्या संधीचा युवक-युवतींनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ए. एस. कदम व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी सुधीर आठवले यांनी केले आहे.

धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण द्या

हिंगोली- धनगर एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या मागणीसाठी आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हिंगोलीचे उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे व हिंगोलीचे तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांच्याकडे धनगर समाजाच्यावतीने विविध मागण्यासाठी निवेदन दिले. यावेळी गोपाल सातपुते, माजी पंचायत समिती सदस्य गणेशराव गडदे, भगवान पावडे, विजय नाईक, भारत अण्णा ढाले, शंकर ढाले गजानन हाके, चंद्रकांत मस्के, पवन पोले, कविताताई इमडे, पांडुरंग इमडे, शिवाजी कोल्हे, विठ्ठल मस्के, संजीव पोले, अविनाश खताळ यांच्यासह धनगर समाज बांधव उपस्थित होते.

कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ सप्टेंबर

जिल्ह्यात यावर्षी पावसाचे प्रमाण ३३% अत्यल्प असून अनेक भागात पावसाने मोठी दडी मारली आहे. पावसाअभावी खरीप हंगामातील पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, हळद तसेच इतर पिके सुकून गेली आहेत. निवेदनात हिंगोली जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची तातडीने पाहणी करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीच्या प्रमाणात तातडीची आर्थिक मदत व दुष्काळी अनुदान देण्यात यावे. सर्व नुकसानग्रस्त गावांमध्ये तातडीने पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई निश्चित करावी. पीक विमा योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना त्वरित पीक विमा भरपाई मिळण्यासाठी विमा कंपन्यांना निर्देश द्यावेत. शेतकऱ्यांच्या कर्जाच्या वसुलीस तात्पुरती स्थगिती देऊन आवश्यक कर्ज पुनर्गठनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांचा तातडीने लाभ द्यावा. हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या गंभीर परिस्थितीचा शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांच्या हातात पीक उरलेले नसताना त्यांना शासनाच्या मदतीची नितांत गरज आहे. त्यामुळे या निवेदनाची तातडीने दखल घेऊन हिंगोली जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करावे निवेदनावर पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषदेचे सचिव शशिकांत देशमुख, कोषाध्यक्ष विलास काळे, उपाध्यक्ष रवी सूर्यवंशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

शहरातील पात्र निवासी अतिक्रमणे शासन निर्णयानुसार नियमित करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ सप्टेंबर

राज्य शासनाने दि २५ मार्च २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये १ जानेवारी २०११ किंवा त्यापूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या पात्र निवासी अतिक्रमणधारकांना नियमानुसार नियमितीकरणाची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच पात्रता निश्चित करण्यासाठी विविध शासकीय व अधिकृत पुरावे ग्राह्य धरण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार शहरातील अतिक्रमणधारकांना न्याय देण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

शहरातील पेन्शनपुरा, गवळीपूरा, बेलदारपूरा, मस्तानशहा नगर, सिध्दार्थ नगर, हमालवाडी, अण्णाभाऊ साठे नगर, बावनखोली, रिसाला बाजार, वंजारवाडा, निरंजनबाबा चौक, महादेववाडी पलटण, दत्त मंदिर आदी भागांमध्ये अनेक वर्षापासून गोरगरीब व मध्यमवर्गीय लोक वास्तव्य करीत आहेत. त्यांच्या घरांना वीजजोडणी, मालमत्ता कर, मतदार यादीतील नोंद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नोंदी, घरकुल योजना व इतर शासकीय योजनांचा लाभ मिळालेला आहे. त्यामुळे शासन निर्णयातील निकष पूर्ण करणाऱ्या कुटुंबांना त्यांच्या दीर्घ काळच्या वास्तव्यास असलेल्या जागेचा कायदेशीर हक्क मिळावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष शेख निहाल भैय्या, शेख शकील अहेमद, कय्युम पठाण, ॲड अमित कळासरे, सुखदेव बलखंडे, सय्यद बासीत मौलाना, मुजीब कुरेशी या नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

१२ सप्टेंबरला हजारो मराठा बांधव अंतरवली सराटीला जाणार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ सप्टेंबर

येथील शासकीय विश्रामगृह येथे मंगळवार दि ८ सप्टेंबर रोजी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने मराठा आरक्षण संदर्भात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

यावेळी समन्वयक माधवराव कोरडे, विनायक भिसे, भुषण देशमुख, अमोल जाधव, मनिष आखरे, इंगोले पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

१२ सप्टेंबर ला हिंगोली जिल्ह्यातील सकल मराठा समाज बांधव अंतरवली सराटी येथे जाणार आहेत. हिंगोली जिल्ह्यात सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या राजकीय कार्यक्रमावर बहिष्कार टाकणार आहे. हिंगोली जिल्ह्यात ५० हजार मराठा समाजातील नागरिक जाणार आहेत. प्रत्येक जण आपापल्या परीने अंतरवली सराटी येथे जाणार आहेत. १२ सप्टेंबर रोजी मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षण संदर्भात पुढील निर्णय घेणार आहेत.

सांदीपनी पब्लीक स्कुलमध्ये संस्कृत दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ८ सप्टेंबर

सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनिल नगर, तरोडा (बु.) नांदेड येथील शाळेत संस्कृत दिनाचे औचित्य साधून शाळेत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी संचालक सुनिल राठोड यांच्या हस्ते सरस्वती, संस्कृत कालीदास यांच्या प्रतिमेची पुजन करून कार्यक्रमाच्या सुरूवातील करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत संस्कृत गीताने करण्यात आले, त्यानंतर भरतनाट्याचे व वेगवेगळ्याचे गीताचे सादरीकरण करण्यात आले. तसेच शाळेच्या मैदानात संस्कृत साहित्य प्रदर्शनाचे ही आयोजन करण्यात आले होते. तसेच झेलम पत्रिका या नावाने वार्षिक संस्कृत पत्रिकाचे अनावरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे वक्ते प्रा. शंतनु कस्तुरे यांनी संस्कृत भाषेविषयी सखोल मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन श्रावणी गडगिळे, सौख्या पालमकर यांनी केले. व या कार्यक्रमाला संस्कृत विषयाचे सहशिक्षक गोविंद पांचाळ यांनी मुलांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच बोर्डातून संस्कृत विषयात शंभर पैकी १०० गुण घेणाऱ्या कु. सोनाक्षी राठोड व वेदांत नाईक यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला सौ. पुष्पा सुनिल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रित कौर, प्रा. ज्ञानेश्वर पांचाळ, यांची उपस्थिती होती. शाळेचे सर्व शिक्षकवृध्द परिश्रम घेतले.

संक्षिप्त...

बाबासाहेब पाटील यांची दैठणा येथे भेट

तभा वृत्तसेवा

दैठणा, दि. ८ सप्टेंबर : महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सोमवारी दैठणा येथील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेला भेट देऊन नूतन बँक इमारतीची पाहणी केली. यावेळी त्यांनी इमारतीच्या बांधकामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर झालेल्या संवादात दैठणा परिसरातील सहकार क्षेत्रातील विकासकामे, बँकेचा व्यवहार, कर्जवाटप तसेच विकासकामांमध्ये येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून विविध बाबींची माहिती जाणून घेतल्यानंतर मंत्री पाटील यांनी, पुढील काळात कोणतीही अडचण निर्माण झाली तर माझी भेट घ्या. अडचण कोणतीही असो, त्यावर आपण निश्चितपणे मार्ग काढू, असा विश्वास देत मार्गदर्शन केले.

यावेळी दैठणा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व्यंकटरावजी बिरादार, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन उमेश मोरे, समाजसेवक सुखदेव पाटील, शिरूर अनंतपाळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विठ्ठल पाटील, दैठणा गावचे विद्यमान उपसरपंच तथा माजी सरपंच योगेशजी बिरादार, अण्णाराव पाटील, बँक अधिकारी चंद्रकांत जाधव, विजयकुमार सामानगावे आणि निळकंठ बिरादार आदी उपस्थित होते.

गुरव समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ सप्टेंबर : येथील शहर गुरव समाजा तर्फे सद्गुरू शंकर लिंग महाराज महाराज मठात गुणवंत विद्यार्थी सत्कार व स्नेहभोजन कार्यक्रम संपन्न झाला. दहावीच्या परीक्षेत९४ टक्के गुण घेणारे मनोहर शिवाजी जवळगे, ९०% गुण संस्कृती बाबुराव बिरादार, चौथी स्कॉलरशिप परीक्षेत भावना भीमसेन भडगे, बॅचलर ऑफ फिजिओथेरपी डॉ. धनश्री भगवान बिरादार, एलएलबी परीक्षेत ऋषभ रवी तेज घुगे, एम टेक बायोटेक्नॉलॉजी परीक्षेत श्रेया अनिल पाटील या विद्यार्थ्यांचा तसेच गटशिक्षणाधिकारीपदी कैलास होदरणे, उपमुख्याध्यापक भगवान बिरादार, सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. अंकुश पाटील पदोन्नती झाल्याबद्दल शाल पुष्पगुच्छ व विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले प्रारंभी संत काशिबा महाराज गुरव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.अध्यक्षस्थानी हरिभाऊ जवळगे होते .पाहुणे महावितरणचे सेवानिवृत्त सहाय्यक अभियंता संजय घुगे , डॉ.कृष्णा नाईकवाडे, सौ प्रतिभा ठाकूर यांची उपस्थिती होती. सर्वच वक्त्यांनी स्तुत्य प्रेरणादायक उपक्रम असल्याचे सांगून यशवंत यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक प्रा. प्रवीण जाहुरे यांनी केले. रामदास नारंगवाडे, पत्रकार नरेश बिरादार यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संदेश बोरोलकर यांनी केले. आभार अजय मुंरळे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी कैलास पाटील ,बाबुराव पाटील, नारायण पाटील, प्रमोद पाटील , राहुल नाईकवाडे ,नितीन आलमले दीपक येरोळकर, नामदेव जावरे, मुरलीधर पाटील, विठ्ठल ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

अल निनोच्या लाटेत शेतकऱ्यांच्या तोंडचा घास करपला

कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी पावसाअभावी पिके करपली जनावरांच्या चायाचा प्रश्न गंभीर थकित व यंदाचा पिक विमा तात्काळ देण्याची मागणी

तभा वृत्तसेवा /सुधीर गंगणे

ओसा दि.८ सप्टेंबर : उसने अवसान काढून का होईना शेतकऱ्यांनी यंदाच्या खरीप हंगामासाठी जय्यत तयारी केली खरी पण पाऊस पीक पदरात पडेल एवढाही पडला नाही. या हंगामात अल निनोच्या लाटेतील रखरखत्या उन्हाने उन्हाळ्यातीलही गर्मीचे रेकॉर्ड मोडले आहेत.याचा या हंगामात विपरीत परिणाम होऊन जनावरांच्या चाऱ्यांसह उभी पीके जाग्यावरच करपत असून अख्खा खरिप हंगाम शेतकऱ्यांच्या हातून गेला आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.शासनाने कोरडा दुष्काळ जाहीर करून थकीत व यावर्षीचा पीक विमा तात्काळ द्यावा.अशी मागणी होत आहे.

गेल्या दोन तीन हंगामात पावसाने सलगपणे आगळीक केल्याने खरिप व रब्बी हंगामाच्या उत्पादनात मोठी घट झाली.उत्पादनात झालेल्या तुटीमुळे शेतकऱ्यांच्या कर्जाच्या ओझ्यात भर पडली.या थकीत कर्जाच्या ओझ्याला गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाने केलेल्या सातबारा कोरा,कोरा,कोराच्या घोषणेने काहीसा दिलासा मिळाला होता.दोन वर्ष उलटली

सातबारा कोरा झाला नाही.यातून कर्जाच्या ओझ्यात भर पडली.आणि गेल्या हंगामातील पीक विमा मिळाला नाही.यामुळे यंदाच्या हंगामात पेरणीसाठी अडचणी वाढल्या होत्या.

बँकात व बाजारात पत शिल्लक उरली नाही. देवाण घेवाण जाग्यावर थांबली.खाजगी सावकारांचा रेटा वेगळाच यामुळे हंगाम तोंडावर आल्यावर पेरणी कशी करावी.ही मोठी अडचण समोर होती.याच काळात पीक विमा चे तुणतुणं वाजलं आणि एकच धावपळ सुरू झाली.पीक विम्याचा वायद्यावर शेतकऱ्यांनी अख्खी पेरणी केली.परंतू निसर्गाला हेही मान्य झाले नाही. गेल्या पाच सहा दशकांत पाहिला नाही. असा एल निनो यावर्षी आला.पण या वर्षीच्या हंगामातील पहिल्या नक्षत्रात पडलेल्या पावसाने मोठा दिलासा दिला. कमी जास्त पडर्णाया पावसामुळे पेरण्या झाल्या. पिकांची उगवण झाली. आंतरमशागती, फवारणी,खुरपणी झाली.ऐण फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत पिकं असताना पावसाने पाठ फिरवली.आणि पुन्हा खाजगी सावकारी तगादा सुरू झाला.मशागत आणि पेरणी केलेल्या ट्रॅक्टर चालकांचे हेलपाटे सुरू झाले. या काळातही पीक विमा पावला नाही. त्यामुळे गेल्या निवडणुकीत झालेल्या चुकांची उजागर गावागावांतील ओट्या कट्यावर होत असल्याचे आज तरी दिसून येत आहे.

खरिप हंगामातील व पावसाळ्यातील हंगामाचा शेवटचा महिना सध्या सुरू आहे.गेल्या तीन महिन्यांत ओसा तालुक्यात जवळपास ४००मि मी पाऊस अपेक्षित असताना २०० मिमी च्या आसपास पाऊस पडला आहे.यावर्षी निम्मा च पाऊस पडल्याने विहिरींनी तळ गाठला आहे. तर विंधन विहिरी आजच उचक्या देत आहेत.

यामुळे खरिप हंगामातील पिकांना शेतकऱ्यांना पाणी देता येत नाही.यावर्षी पाऊस कमी पडल्याने पाणी साठ्यात वाढ झाली नाही.आणि जमिनीत रब्बी हंगाम येईल अशी ओली नाही.यामुळे औसा तालुक्यात पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. दिवसभर धगधगत्या उन्हात अधूनमधून येणाऱ्या ढगाळ वातावरणामुळे उन्हाची दाहकता वाढत आहे.परिणामी अवर्षणात वाढ होऊन पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे.अशा या नैसर्गिक वातावरणामुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे. शासनाने तातडीने पाहणी करून गेल्या वर्षीचा आणि या वर्षीचा पीक विमा तात्काळ द्यावा. व दोन लाखांच्या कर्जमाफीचे गाजर दाखवणे बंद करून विधानसभेच्या निवडणुकीत दिलेल्या सातबारा कोरा करण्याच्या आश्वासनांची पूर्तता तात्काळ करावी. अशी मागणी ओसा तालुक्यातून जोर धरीत आहे.

ऊस उत्पादक स्लाईनवर

यंदा पाऊस कमी झाल्याने उसाची वाढ खुंटली आहे. आणि गेल्या तीस पस्तीस दिवसांपासून पावसाने गुंगारा दिल्याने ऊस वळत आहे.त्यामुळे यंदा उसाचे उत्पादन अर्ध्याहून कमी होणार असल्याची भिती शेतकऱ्यांतून व्यक्त केली जात आहे.

नामानायक महाराजांनी भक्ती,अध्यात्म,सदाचार,मानवता,सामाजिक एकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला :आ. संजय बनसोडे

तभा वृत्तसेवा

जळकोट दि. ८ सप्टेंबर : संत-महात्म्यांच्या विचारांची परंपरा ही समाजाला योग्य दिशा देणारी आहे. नामानायक महाराजांनी भक्ती आणि अध्यात्मासोबतच सदाचार, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केले. त्यांच्या विचारांचे आचरण केल्यास समाजात प्रेम, शांतता आणि एकोपा निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असे प्रतिपादन माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी केले जळकोट तालुक्यातील गुत्ती (अग्रवाल तांडा) नामानायक गड येथे आयोजीत सत्परुषी नामानायक महाराज जळभोग व भव्य जयंती महोत्सवाप्रसंगी बोलत होते.

यावेळी मुखेडचे आ. डॉ. तुषार राठोड, माजी आमदार गोविंद केंद्रे, लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सौ. उषाताई पाटील तळेगावकर, संभाजी पाटील तळेगावकर, लातूर जि. प. चे बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, रामराव राठोड, रमन अदावळे, प्रकाश राठोड, गुत्तीच्या सरपंच मिनाताई केंद्रे, यादव केंद्रे, प्रा.श्याम डावळे, मीरा सुर्यवंशी, तहसिलदार सुधाकर राठोड, सत्यवान पांडे, पवन चव्हाण, संदिप आडे, प्रकाश बिरादार, कमलाकर फुले, शशिकांत बनसोडे, शिवकुमार कांबळे, चंद्रशेखर पाटील, पाशा शेख, दिपक आंब्रे, संयोजक डॉ.गजेंद्र राठोड, डॉ.भारती राठोड, मानसिंग आडे, पंकज आडे, मनोज कांबळे, गंगाधर पीटलेवाड, डॉ.रंजीत काळे, सुधीर चव्हाण, रश्मी राठोड, ज्योती राठोड, डॉ.प्रियंका राठोड, राजु राठोड, गोविंद राठोड, आदी उपस्थित होते . यावेळी उपस्थित मान्यवरांनी नामानायक महाराजांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचे स्मरण केले.पुढे बोलताना आ. संजय बनसोडे म्हणाले की, संतांचे कार्य हे केवळ धार्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नसते, तर त्यांच्या विचारांमधून समाजाला जीवन जगण्याची मूल्ये मिळतात. नामानायक महाराजांनी सामान्य माणसाला भक्तीच्या माध्यमातून आत्मिक समाधानाचा मार्ग दाखविला. त्याचबरोबर सत्य, प्रामाणिकपणा, परोपकार, संयम आणि सदाचार यांचे महत्त्व समाजाला पटवून दिले.

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत संत-महात्म्यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरत आहेत. समाजामध्ये जात, धर्म, पंथ आणि विविध भेद बाजूला ठेवून मानवतेच्या नात्याने एकत्र येणे गरजेचे आहे. नामानायक महाराजांनी दिलेला सामाजिक एकतेचा संदेश प्रत्येकाने आत्मसात करावा, असे सांगुन 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे हीच संतांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल. युवकांनी संतांचे साहित्य व विचार समजून घेऊन ते आपल्या आचरणात आणावे. अध्यात्माबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारा समाज निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असेही आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.कार्यक्रमादरम्यान विविध धार्मिक विधी, भजन, कीर्तन तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नामानायक महाराजांचे दर्शन घेतले. परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गजेंद्र राठोड यांनी केले तर आभार सुत्रसंचालन प्रा.कीशन राठोड यांनी केले.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, भाविक तसेच महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक व भक्त मंडळींनी परिश्रम घेतले.

महात्मा गांधी वाचनालयाचा स्तुत्य उपक्रम

जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना वर्षभर मोफत पेन वाटप

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ८ सप्टेंबर : चाकूर तालुक्यातील भाटसांगवी येथील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी एक अभिनव आणि स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे.या उपक्रमाचा शुभारंभ वाचनालयाचे अध्यक्ष अण्णाराव दाडगे यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वाचनालयातर्फे संपूर्ण वर्षभरासाठी मोफत निळा व लाल बॉलपेन देण्यात येणार असून

या पेनवर वाचनालयाचे नाव छापलेले असणार आहे. विद्यार्थ्यांने प्रथम आपल्या वर्गशिक्षकाकडून निळा व लाल पेन घ्यायचा आहे. पेन संपल्यानंतर वाचनालयाचे नाव असलेला रिकामा झालेला पेन वर्गशिक्षकांकडे जमा करायचा असून, तो जमा केल्यानंतरच विद्यार्थ्याला नवीन पेन दिला जाणार आहे.अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना वर्षभर पेन दिला जाणार आहे.

या आगळ्या वेगळ्या नियमामुळे विद्यार्थ्यांना वर्षभर मोफत पेन तर मिळणारच आहेत, शिवाय पेन हरवणार नाही याची काळजी विद्यार्थी घेतील. यातून वस्तू जपून वापरण्याची आणि सांभाळण्याची चांगली सवय विद्यार्थ्यांना लागेल, तसेच पेन संपेपर्यंत सातत्याने लेखन करण्याची सवय लागेल, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

यावेळी शिक्षक दिनाचे औचित्य साधून वाचनालयाचे अध्यक्ष अण्णाराव दाडगे यांनी स्वतः विद्यार्थ्यांना पेनचे वाटप केले व शाळेतील शिक्षकांचा सत्कार केला.या सामाजिक उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक विरभद्र बावगे, शाळा व्यवस्थापन समिती आणि सर्व शिक्षकांनी वाचनालयाचे कौतुक केले असून आभार मानले आहेत. शिक्षणात लेखन साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व असून वाचनालयाने दिलेले हे पेन म्हणजे विद्यार्थ्यांसाठी प्रगतीची प्रेरणा असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले. याप्रसंगी शाळेच्या वतीने अण्णाराव दाडगे यांचे आभार मानून त्यांचा सत्कार करण्यात आला.

औसा तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा एमआयएमची मागणी

तभा वृत्तसेवा

औसा दि. ८ सप्टेंबर : पावसाळा संपत आला तरी पिकांना पुरेसा आणि समाधानकारक पाऊस झाला नाही. हातातोंडाशी आलेली खरिपातील पीक वाया गेली आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांसमोर जगण्यासाठी मोठे आर्थिक संकट उभा आहे. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने ओसाड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा. अशी मागणी एमआयएमचे जेष्ठ नेते मुइझफरअली इनामदार यांनी तहसीलदार यांच्यामार्फत शासनाकडे केली आहे.

यावर्षीच्या खरिप हंगामात पेरणी पासूनच पावसाने हात आखडता ठेवला. यातून पीके चांगली येथूनही हातातोंडाशी आलेल्या पिकांना शेवटच्या टप्प्यात पाऊस कमी पडला.यामुळे वर्षापेक्षा पीक चांगली येवून जाग्यावर वाळत आहेत.निसर्गाच्या या अवकृपेमुळे भरून न येणारे नुकसान होत आहे. पावसाअभावी प्रकल्प, तलाव, विहीर,विंधन विहिरी कोरड्या ठाक पडत आहेत.त्यामुळे जनावरांच्या चाऱ्यांसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी शासनाने पाहणी करून औसा तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

याचबरोबर ओसाड तालुक्यासह लातूर जिल्हा व मराठवाड्यात सारखीच परिस्थिती झाली आहे. त्यामुळेऔसा तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात तात्काळ 'अधिकृत दुष्काळ' जाहीर करावा. देवस्थान इनाम जमीन असलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून योजनेत समाविष्ट करुन थेट त्यांच्या खात्यावर मदत रक्कम जमा करुन शासनाच्या इतर योजनांचाही लाभ देण्यात यावा.बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी. शेतीकर्ज वसुलीस तात्काळ स्थगिती देऊन संपुर्ण पीक कर्ज माफ करण्यात यावे.ग्रामिण भागात पिण्याच्या पाण्याचे टँकर व जनावरांसाठी चारा छावण्या त्वरीत सुरु कराव्यात.व

विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करावी .अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. नंदकुमार देशपांडे,नवनाथ भोसले,अजीत पांडे,राजू शेख,मुनीर काद्री, बालाजी साळुंके यांच्या सह शेतकरी उपस्थित होते.

गुरूंचा गौरव, विद्यार्थिनीला मदतीचा हात

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ सप्टेंबर : ज्ञानाची ज्योत तेवत ठेवणाऱ्या शिक्षकांचा सन्मान आणि आर्थिक अडचणीतील विद्यार्थिनीच्या शिक्षणाला मदतीचा हात देत जिव्हाळा ग्रुपने शिक्षक दिनानिमित्त सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यादेवी होळकर सभागृह, उदगीर येथे आयोजित *'जिव्हाळा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार'* सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पाच शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विठ्ठलराव फुलसे यांनी स्वागतगीत सादर केले.

यावेळी श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. म. ई. तंगावार,* केंद्रप्रमुख *श्री. रमेश जाधव,* सहशिक्षिका *सौ. कल्पना कुलकर्णी, सौ. वर्षाताई पाटील आणि सहशिक्षक ईश्वर कुंभार यांना 'जिव्हाळा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार'* प्रदान करून सन्मानित करण्यात आले. तसेच *दीक्षा भुताळे* या विद्यार्थिनीच्या शिक्षणासाठी मदतनिधी देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त श्री. विश्वनाथ मुडपे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अंबरखाने, योगगुरू डॉ. संग्राम पटवारी, माजी विस्तार शिक्षण संचालक प्रा डॉ अनिल भिकाने व जिव्हाळा ग्रुपचे उपाधक्ष मोहनराव खिंडीवाले उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आ. संजय बनसोडे

नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ सप्टेंबर : पाऊस नसल्याकारणामुळे आणि हवामानामुळे उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघातील विविध भागांत शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी उदगीर मतदार संघातील लोहारा , करडखेल , डिग्रस आदी भागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली .

पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यासह विविध खरीप पिकांचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी आमदार संजय बनसोडे यांच्या निदर्शनास आणून दिले. अनेक ठिकाणी शेतात पाणी नसल्यामुळे पिकेवाळून गेली आहेत तर काही ठिकाणी पिकांच्या पानाला कीड लागून ती खराब झाली असून, काही भागांत उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

यावेळी आमदार संजय बनसोडे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. नुकसानग्रस्त एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

तसेच नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने आणि वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करावा, पंचनाम्याच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब होऊ नये, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्यास शासनाच्या मदतीपासून कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही. प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळवून द्यावा, असे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केल्याबद्दल शेतकऱ्यांनी आमदार बनसोडे यांचे आभार मानले आहेत . प्रशासनाने पंचनाम्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून द्यावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, जिल्हा परिषदेचे गटनेते प्रा . दिलीप मटके, लोहारा गटाचे जि . प . सदस्य मुकेश भालेराव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील , शशिकांत बनसोडे ,बाळासाहेब मरलापल्ले,विकी भोसले , शिवकुमार कांबळे , संदीप बिरादार,ज्ञानेश्वर पाटील रावणगावकर, बबन धनबा, शुभम केंद्रे,आदीसह परिसरातील शेतकरी, सरपंच , उपसरपंच उपस्थित होते .

बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६

www.tarunbharat.net

तरुण भारत

साहित्य-संस्कृती ७

● संयोजक : संजय रामगिरवार, ९८८१७१७८३२ ●

निसर्गभान

● वृंदा जोगळेकर
नागपूर/९४२२११३९४१

हिरवे चैतन्य

पावसाळी दुपार...आभाळ भरून आलेले... झुकझुक झुकझुक... गाडी चाललीय... मी माझ्या आवडत्या जागी... खिडकीतून बाहेर बघत... हिरवागार आसमंत... चटक हिरवा अन् पोपटी मखमली गालिचा जमिनीवर पसरलेला आहे. तर काही शेतात काळ्या मातीत अगदी लाईनमध्ये लावलेली भाताची छोटी-छोटी रोपटी, काही शेतातून पाणी, त्यातून झळकणारा आभाळाचा तुकडा आणि शेतात भाताची रोपे लाईनीत लावताना बायका! या बायकांच्या साड्यांमुळे जरा वेगळ्या रंगांचे दर्शन! एखाद्या शेतात, हिरव्या गालिचा वर उठून दिसणारा एखादा शुभ्र पांढरा बगळा त्या ओलसर हिरव्या तांदळाच्या शेतातून किडे-अळ्या शोधतो आहे, तर गंभीर भाव चेहऱ्यावर ठेवून आठ-दहा बगळे गोल गहन विषयावर चर्चा करीत बसलेले. गंमत म्हणजे अचानकच त्यांच्यामध्ये काय बातचीत होते, ते कळत नाही, पण एकाच वेळी पंख उघडून ते सगळे हवेत झेपावतात, तेव्हा एखादा शुभ्र फुलांचा ताटवा आकाशात झेप घेतोय असे वाटते. मध्येच कुठे एखादी लाल चोचीच्या टिटव्यांची जोडी आपले पांढरे पंख पसरवून त्यावरची सुंदर काळी डिझाईनची किनार दाखवत उडताना दिसते आहे. एखाद्या झाडावरून एकदम हवेत झेपावणारा मैनांचा थवा लक्ष वेधून घेतो, तर उडणाऱ्या पोपटांचा थवा येऊन एखाद्या झाडात अदृश्य होतो. शेतातील जमिनीवरून एकदम आठ-दहा काळे पक्षी उडाले. कोणते हे पक्षी? छोटे ओहोळ आणि पावसाळ्यात जमलेल्या डबक्यातले किडे खाणाऱ्या त्या काळ्या पाणकोंबड्या होत्या. झाडाच्या टोकाशी एका बोडक्या फांदीवर खंड्या चहू बाजूंना लक्ष ठेवून असतो. एका झाडावर, शुभ्र अंगरख्यावर काळसर राखाडी झूल पांघरून लाल माणकाच्या डोळ्यांनी एक कापशी घार इकडेतिकडे बघत असते.

दूरवर हिरव्यागार टेकड्या आणि पायथ्यापर्यंत पसरलेल्या शेतांमध्ये अधूनमधून हिरवागार अंगरखा घातलेले उंच देखणे वृक्ष उभे आहेत. पावसाळ्यात फुलं नसली तरी प्रत्येक झाडाचे हिरवे देखणेपण आगळेवेगळेच असते. शेतात काम पीक पेरले आहे त्यानुसार त्याचे हिरवेपण! हिरवाकंच, हलका भुरकट हिरवा, पोपटी हिरवा तर कुठे पिवळसर हिरवा! प्रत्येक पिकाचे स्वतःचे हिरवेपण वेगळे तरीही सौंदर्य मात्र निःसंशय वर्णनातीत! दाट काळसर हिरव्या पानांचे एखादे आंब्याचे झाड शेताच्या मध्यभागी उभे आणि त्याच्या खाली छोटीसे खोपटे, गुलमोहराने लाल-केशरी टोपी काढून आता चक्क हिरवी छत्री डोक्यावर धरली आहे, शिरीष वृक्षांच्या माथ्यावरती हिरवे-पोपटी पानांचे कमी उंचीचे छोटे धबधबेच जणू! आपले काटे बारीक पोपटी छोट्या पानांमध्ये लपवून पिवळ्या गोल बोराच्या आकाराच्या फुलांचा नक्षीदार शेला पांघरून बाभूळ नटली आहे. सागवानाच्या झाडांमधून हलक्या पोपटीसर रंगाचे फुलोरे फुलले आहेत. वार्यासोबत या उंच गुढ्या मजेत हळूहळू झोके घेतात. कडुलिंबाच्या प्रत्येक फांदीला टोकाशी एक गुबगुबीत हिरव्या पानांचा खूप मोठ्ठा चेंडू आहे असे वाटते.

लाल-पिवळ्या नाजूक फुलांचे गुच्छ लेवून फुललेली घाणेरी सुंदर दिसते आहे. घाणेरीच्या फुलांवर रंगीबेरंगी फुलपाखरे फडफडताहेत. आसपास वाढलेल्या हिरव्या गवताला आलेले तुरे आणि त्यावर बसलेले केशरी, लाल, काळे चतुर! त्यांचे दोन जाळीदार पंख जमिनीला समांतर ठेवून त्या तुऱ्यांवर बसले की त्या पंखांची पारदर्शकता आकर्षित करते.

पावसाच्या सरींनी वसुंधरेला हिरव्या रंगात नटवले, सजवले आहे. हा सृजनाचा अप्रतिम आविष्कार! या हिरवाईच्या उधाणाने माझ्या अस्वस्थ मनाला गुंतवले. ती हिरवाई मनात अशी झरली की जे दिसले झरझर शब्दात मांडले. पण शब्द थोटकेच आहेत हे मन मोहणारे चित्र रेखाटायला!

पावसाच्या पाऊलखुणा
दिसताहेत अवती - भवती.
हवेत फुलपाखरं भिरभिरती
पक्षांचे थिरकणे त्यावरती.
नव जीवनाचा संकेत देती
मनही नाचतय त्या तालावरती.
सजलेली सृष्टी सृजनोत्सवात
उत्साह भरलाय आसमंतात!
झाडं, पक्षी, फुलं नि पानं
सारेच गाताहेत निसर्गाचं गाणं.
त्याचा नाद, त्याचीच लय अन्
त्यावर माझं ही रुमझुमणं!!!

वैदर्भीय

● प्रकाश एदलाबादकर
नागपूर/९८२२२२२११५

सोन्याची कुऱ्हाड आणि मोगऱ्याच्या कळ्या

साधारण पस्तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आम्ही रेशीमबागेत राहत असताना आमच्या शेजारी मूळचा ग्रामीण भागातील एक परिवार राहत होता. त्या घरातील कर्तापुरुष सरकारी अधिकारी होता. त्यांची साधारण ऐंशी वर्षांची वृद्ध आई कुटुंबात होती. या परिवारची जवळपासच कुठेतरी शेती होती. साहेबांचा धाकटा भाऊ शेती बघत असे. तो महिन्यातून एकदा नागपूरला येई आणि आपल्या म्हाताऱ्या आईला गावी घेऊन जाई. म्हातारी गावाकडे साधारण आठवडाभर मुक्काम करून नागपूरला परत येई. एका महिन्यात त्याचे येणे झाले नाही.

एकदा शनिवारची सकाळची शाळा आटोपून मी घरी आलो. हिवाळ्याचे दिवस होते. त्या शेजारच्या मावशी घराच्या गच्चीत उन्हात बसल्या होत्या. मावशी या सुमाराला गावाला जातात, हे मला ठावुक होते. मी सहज विचारले, ''मावशी गावाकडे गेल्या नाही वाटते यावेळी?''

''न्हाई ना बापू. दौलत आलाच न्हाई मले घ्यासाठी. का जनं का झालं असन त!'' मावशी उत्तरल्या. ''कोणतं गाव आहे तुमचं?'' माझा प्रश्न.

''सेलू'' मावशींनी गावाचे नाव सांगितले.

''कुठे येते हे गाव?'' पुन्हा माझा सवाल.

''तुले म्हाईत न्हाई सेलू?'' आता मावशीचा प्रश्न.

''नाही मावशी. माझा सगळा जन्म शहरात गेला. मला खेडं नाही ठाऊक. कुठे येते सेलू?'' माझ्या या प्रश्नाच्या उत्तरात मावशींनी जे सांगितले, ते मी जन्मात विसरू शकणार नाही. माझ्या विदर्भाची श्रीमंती मावशींनी फक्त दोन ओळीत सांगितली. विदर्भाचा असा भूगोल शाळेतल्या कोणत्याही मास्तरांनी सांगितला नव्हता. सेलू कुठे येते, हे सांगताना मावशी म्हणाल्या...

''नव लाखाची झाडी,
बावन लाखाचं वऱ्हाड
आन मंदी येते सेलू घोराड''

हे ऐकल्याबरोबर माझ्या अंगावर काटा आला. विदर्भाचे तसे दोन भाग पडतात. एक वऱ्हाड आणि दुसरा झाडीपट्टी. अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ हे जिल्हे म्हणजे वऱ्हाड आणि गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली म्हणजे झाडीपट्टी. नागपूर आणि वर्धा हे दोन जिल्हे ना वऱ्हाडात, ना झाडीत! परंतु, वर्ध्याला वऱ्हाड जवळचे आणि नागपूरला झाडी! वर्धा नदी ही विदर्भाचे बरोबर उभे दोन भाग करते. त्या नदीच्या काठावर सेलू गाव येते, एवढाच अर्थ मला समजला. परंतु, नेमका अर्थ काय, हा प्रश्न मला अस्वस्थ करी.

पुढे एका ज्येष्ठ व्यक्तीला मी या म्हणीचा अर्थ विचारला. त्यांनी असे सांगितले की, वऱ्हाडची सुजलाम सुफलाम सुपीक भूमी म्हणजे पांढऱ्या सोन्याचे आगर! अव्वल इंग्रजी जमान्यात तत्कालीन ब्रिटिश सरकारला, काळ्या मातीच्या संपन्न वऱ्हाडातून बावन्न लाखांचा महसूल मिळत असे. म्हणूनच 'वऱ्हाड अन सोन्याची कुऱ्हाड' ही म्हण प्रचलित झाली असावी. झाडीपट्टी म्हणजे वनसंपदेचा भाग आणि तांदळाचे कोठार! मोगऱ्याच्या कळ्यांसारखा भात! या लाल मातीच्या आणि तलावांनी संपन्न असलेल्या झाडीतून सरकारला नऊ लाखांचा महसूल मिळत असे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील रकमेचे हे आकडे आहेत, हे लक्षात घ्या. ही होती माझ्या विदर्भाची श्रीमंती! विदर्भ केवळ संपत्तीनेच श्रीमंत नव्हता आणि आजही नाही. मनानेही हीच श्रीमंती आजवर जपलेली आहे आणि पुढेही जपेल.

आठवण

● सुनील पोकरे
पुणे/७३८५२८९७०९

माझे गाव

नोकरी, व्यवसाय किंवा इतर काही कारणांमुळे आपलं गाव सोडून शहरात स्थायिक झालेल्या प्रत्येकाच्या मनात आपल्या छोट्याशा गावाबद्दल एक अतूट ओढ असते. गावाकडचा निसर्ग, हिरवीगार झाडी, नद्या, डोंगर, मोकळी हवा आणि निवांतपणा सतत मनाला खुणावत असतो.

दरवर्षी बालपणी शाळेला उन्हाळ्याच्या सुट्या लागल्या की, आम्ही भावंडे थेट आजोळी जायचो. दरवर्षी हा आमचा नियमित कार्यक्रम असायचा. सेवाग्राम येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा आश्रम आणि पवनार येथे आचार्य विनोबा भावे यांचा आश्रम आहे, हे आपणास माहिती आहेच. अशा थोर महात्म्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वर्धा येथे माझा जन्म झाला. बालपण आणि शिक्षणही वर्धा येथेच झालं. जन्मभूमी वर्धा असली, तरी कर्मभूमी मात्र पुणे आहे. बालपणी मी माझ्या भावंडांसोबत आजोबांच्या गावी, म्हणजे कोपरा गावी अधूनमधून जात असे. त्यावेळी आजी-आजोबांच्या सहवासातील काही आठवणी अजूनही जशाच्या तशा स्मरणात आहेत. आजोबांचं गाव वर्धा शहरापासून साधारण १५ ते २० किलोमीटर अंतरावर आहे. गावामध्ये एक नदी वाहत होती. तिचं नाव बोर नदी. माझी आई याच नदीतून डोक्यावर हंडे भरून पाणी आणत असे. त्या काळातील गावचं साधं, सुंदर आणि निसर्गरम्य जीवन आजही माझ्या मनात घर करून आहे.

मला पुण्यात येऊन जवळपास चाळीस वर्षे झालीत. नोकरीनिमित्त पुण्यात आलो आणि हळूहळू पुणेकर झालो. मागील वर्षी सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यानंतर जवळपास पन्नास वर्षांनी पुन्हा माझ्या आजोबांच्या गावी जाण्याचा योग आला. गावी जाताना दुचाकीवरून प्रवास केल्यामुळे गावाकडील निसर्गसौंदर्य आणि तिथली खुली, स्वच्छ हवा जवळून अनुभवता आली. जुन्या आठवणींना उजाळा मिळत होता आणि बालपणीचे दिवस डोळ्यांसमोर उभे राहत होते. मात्र, आता गावात खूप सुधारणा झालेल्या दिसल्या. पक्के रस्ते, एसटी बसची सुविधा आणि सेवाग्राम येथून नियमितपणे ये-जा करणाऱ्या सहा आसनी शेअर रिक्षा पाहून खूपच आनंद झाला. गाव बदललं होतं, आधुनिक झालं होतं; पण गावाच्या मातीचा सुगंध आणि जुन्या आठवणी मात्र मनात तशाच जिवंत होत्या.

गावात पाऊल ठेवताच बालपणीचे ते दिवस, आजी-आजोबांचा सहवास, भावंडांसोबत केलेली धमाल आणि बोर नदीच्या काठावरच्या आठवणी पुन्हा एकदा मनात जाग्या झाल्या. काळ कितीही बदलला, माणूस कितीही दूर गेला, तरी आपल्या गावाशी असलेलं नातं कधीच संपत नाही.

सर्वप्रथम गावाचं ग्रामदैवत फक्कडनाथ महाराजांच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतलं. या मंदिरात माझे आजोबा वीणेकरी म्हणून, म्हणजेच वीणा आणि तंबोरा स्वतःच्या हातात धरून कीर्तन करीत असत. त्यांनी वापरलेली वीणा आजही जशीच्या तशी जतन करून ठेवलेली आहे, हे पाहून मला खूप आनंद झाला.

आमचा जुना वाडा होता, तो मात्र आता पडलेल्या अवस्थेत दिसला. बालपणी मी या वाड्यात एक सुंदर बाग पाहिल्याचं आठवतं. त्या बागेमध्ये शोभिवंत फुलझाडे आणि फळझाडे लावलेली होती; परंतु आज ती जागा भकास दिसत होती. आजोबांनी त्याकाळी मुख्य रस्त्यावर एक आंब्याचं झाड लावलेलं होतं. रस्ता रुंदीकरणामुळे हे झाड तोडले गेल्याचे कळले. आजोबांच्या वाड्याशेजारी राहणारे एक जुने परिचित, वाघमारे आजोबा यांची भेट झाली. जवळपास ९५ वर्षांचे असूनसुद्धा त्यांनी आपल्या वर्हाडी भाषेत, तू श्रावण बुद्ध्याचा नातू होय काय? असे विचारले. त्यामुळे मला खूप आनंद झाला.

झुळूक

● मो. बा. देशपांडे
पुणे/८३२९१९३५४२

कोर्टातील गीता

त्या दिवशी संध्याकाळी न्यायमूर्ती श्रीधर पांडे नित्याप्रमाणे कोर्टातील काम संपवून घरी जाण्यास निघाले... आता आजूबाजूला फारसे कुणीच दिसत नव्हते आणि सहज न्यायमूर्तींचे लक्ष तिथे बाजूला लाल कपड्यात गुंडाळून ठेवलेल्या एका वस्तूकडे गेले.

ते टक लावून बघू लागले. मागील कित्येक वर्षांपासून ती वस्तू तिथेच ठेवलेली होती. पण तिच्याकडे फारसं न्याहाळून बघण्याची कामाच्या धांदलीत कुणाला सवड?

आणि काय आश्चर्य बघा! लाल कपड्यात गुंडाळलेली ती वस्तू आज न्यायमूर्तींशी चक्क बोलू लागली! ओळखलंत का मला? अहो मी गीता. येथे अनेक आरोपी, फिर्यादी आणि साक्षीदार माझ्यावर हात ठेवून खऱ्या खोट्या शपथा दररोज घेत असतात. येथे सर्व मला भावनेपोटी वापरून घेतात. आपला कार्यभाग उरकला की माझ्याकडे बघायला जरा म्हणून कुणाला सवड नाही बघा. आजवर मला येथे कुणीही उघडून कधी वाचले नाही. पण मलाही भावना आहेत. मी कुठे कधी कशी व्यक्त होणार?

तू कोण कुठली? मी ओळखलं नाही तुला! न्यायाधीश काहीसे बावचळून म्हणाले. थांबा, माझी ओळख देते. माझा जन्म हरयाणातील राज्यातील कुरुक्षेत्री रणभूमीवर प्रत्यक्ष भगवंताच्या वाणीतून आणि महर्षी व्यासांच्या दिव्य प्रतिभेतून झाला. त्यानंतर ज्ञानियांच्या राजाने अमृताचे पैजा जिंकणाऱ्या भाषेत मला नटवलं. पुढे अनेक मान्यवरांनी माझ्यावर भाष्य टीका वगैरे केली. अगदी लोकमान्यांनी मला आठवलं गीतारहस्य लिहिलंय ते थेट मंडालेच्या तुरुंगात!

अनेक ज्ञानी तपस्वी दिसेनासे होत आहेत म्हणून ही गवाणी सुद्धा दिवसेंदिवस लुप्त होण्याच्या मार्गावर दिसत आहे. पण, आजही गावखेड्यात काही घरी ही गवाणी दिसत असते.

अभ्यासूंनी माझे विविध अर्थ काढले कित्येकांनी विद्यापीठात डॉक्टरेट मिळवली कोणी पाठांतर करतात कोणी पारायण करतात. पण बहुतांश लोकांनी मला कायम लाल कापडात गुंडाळून पूजेत बसवले. मी सर्वत्र नाना रूपात आनंदाने नांदले.

पण शेवटी काय? मी एक पुस्तकच आणि पुस्तकांनाही नशीब असतं. नशिबाचा काय भरोसा? ते कुठे नेऊन ठेवेल काय सांगावं? खरं बोलावं खरी साक्षी द्यावी म्हणून मला चक्क न्यायालयात नेऊन ठेवलं, जिथे माझ्याहून मोठ्या आकाराची भारतीय संविधान, भारतीय दंडविधान, सिव्हिल कोड, क्रिमिनल कोड वगैरे ग्रंथराज ओळीने बसून होते. त्यांचा विषय वेगळा आशय वेगळा. मला बाजूला वेगळ्या ठिकाणी ठेवलं गेलं, मी बापडी लाल वस्त्रात गुरफटून आजवर मुकाट्याने एकटीच बसून राहिली.

माझीच एक प्रत ज्याचं देवळात वाचन पठन होते, दुसरी एखादी प्रत त्याचा एखादा जिज्ञासू अभ्यास करतो, तिसरी एखादी प्रत दुकानात पुस्तकांच्या रांगेत तिष्ठत उभी असते. माझ्यासारखी एखादी प्रत रात्रभर अंधारात एकांतात रुदन करते. कारण दिवसभर सुरू असतो वादविवाद, विदंडवाद अन ऑर्डर ऑर्डरचा हातोडा!

सगळे मला हवे तसे वापरून घेत आहेतहेच का माझं प्राक्तन? मला एकवार उघडा रे. वाचा रे कधीतरी समजून घ्या रे! तुमच्या जीवनात मी मार्ग दाखवेन... तोच माझा उपयोग खरा! तुम्ही तरी मला न्याय द्या हो, कुणी चक्क माझ्यावर हाच ठेवून शपथ घेतात, कधी खरी कधी खोटी आणि होते त्यांची सुटका! पण मी आहे तिथेच राहते, माझी सुटका कधी होणार?

न्यायमूर्ती आता विचारमग्न झाले. आजवर येथे बसून इतके न्यायनिवाडे केलेत. पण असा पेचप्रसंग प्रथमच आला. खरंच पुस्तकांनाही नशीब असतं का? एका गीतेचे मंदिरात वाचन होते तर त्याच गीतेच्या दुसर्या प्रतीला कापडात गुंडाळून शपथ घेण्यापुरते ठेवण्यात येते, याला काय म्हणावे? आता सुद्धा खरंच ही गीता आपल्याशी प्रत्यक्ष बोलली की आपल्याला भास झालाय? की आपल्याच मनातले हे विचार उसळून वर आलेय?

गावगाडा

● संगीता ठलाल
कुरखेडा/७८२१८१६४८५

कोट्यातील गवाणी

गाई-बैलांचा गोठा असतो. त्या गोठ्याला झाडीबोली भाषेत कोटा असे म्हणतात. गावखेड्यात घरोघरी गाई, बैल असतात आणि त्यांना रात्रोला, कधी दिवसा कोट्यात बांधत असतात. गाई-बैलांना घरी चारा खाण्यासाठी सुकलेल्या बांबूपासून तयार केलेलं कमी उंचीचं साहित्य तयार करतात किंवा लाकडं एकमेकांवर मांडून एक साहित्य तयार करतात त्यालाच झाडीबोली भाषेत गवाणी असे म्हणतात.

या गवाणीत धानाची तनस, सुकलेल्या तुरीचा कुटार, उडीद, मूगाचा कुटार या गवाणीत ठेवत असतात. जास्त पाऊस (झड) असल्यामुळे गाई, बैल चारा खाण्यासाठी बाहेर नेले जात नाही, तेव्हा याच गवाणीतला कुटार, तनस गाई, बैल खात असतात. गावखेड्यातील या मातीच्या कोट्यात असलेली ही गवाणी खूप जुने साहित्य आहे व ती गावखेड्याची विशेष संस्कृती आहे. जेव्हा शेतकरी या गवाणीत धानाची तनस, कुटार भरून ठेवत असतो तेव्हा जनावरांना चारा खाण्यासाठी अडचण जात नाही.

या गवाणीतील चारा इकडे, तिकडे पसरत नाही त्यामुळे गोठ्यात कचरा सुद्धा होत नाही. ही गवाणी गोठ्यात वेगळीच शोभून दिसते. कारण कोटा, गोठा हा मातीचा असतो, त्यात छान जुने कोनोडे बनवले असतात. दिवाळीच्या सणाला याच गोठ्यात असलेल्या कोनोड्यात पाच दिवस दिवे ठेवले जातात, त्यामुळे हा मातीचा गोठा अजून छान शोभून दिसतो. आजकाल गावखेड्यात सुद्धा जास्त प्रमाणात गाई, बैल दिसत नसल्यामुळे गोठेही

खाद्य संस्कृती

● डॉ. मदन काकडे
नागपूर/९३७३११२४८७

अमेरिकन खाद्यान्न

अमेरिकेची खाद्यसंस्कृती ही विविध देशांतून आलेल्या लोकांच्या आणि स्थानिक पदार्थांचे संमिश्र स्वरूप आहे. बर्गर, पिझ्झा, फ्रेंच फ्राईज, हॉट डॉग, मॅक्रोनी, पॅनकेक्स, डोनट्स, बार्बेक्यू आणि डीप फ्राय केलेले पदार्थ अमेरिकेत अत्यंत लोकप्रिय आहेत. अन्नपदार्थ तयार करताना चीज, बटर, वेगवेगळे सॉस आणि मेयोनीजचा सढळ हाताने वापर केला जातो.

इटालियन, आफ्रिकन, मेक्सिकन आणि आशियायी संस्कृतीचा अमेरिकन जेवणावर मोठा प्रभाव आहे. कामाच्या धावपळीमुळे रेडी-टू-ईट आणि फ्रोजन फूडला पसंत केले जाते. स्टँडर्ड अमेरिकन डाएट (एसएडी) हा वैद्यकीय दृष्टीने खरोखरच 'सॅड' आहे. अमेरिकन आहार पद्धती ही जगभरात तिच्या चवीसाठी आणि सोयीसाठी प्रसिद्ध असली तरी ती आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. अमेरिकन आहारात पॅकबंद अन्न, फ्रोजन मिल्स आणि रेडी-टू-ईट पदार्थांचा वापर सर्वाधिक होतो. बर्गर, पिझ्झा, फ्रेंच फ्राईज आणि डोनट्स यांचा रोजच्या आहारात मोठ्या प्रमाणात समावेश होतो. कोल्ड ड्रिंक्स, पॅकबंद ज्यूस आणि सॉसच्या माध्यमातून शरीरात खूप जास्त प्रमाणात साखर आणि मीठ जातं. दैनंदिन आहारात ताजी फळे, फळभाज्या, पालेभाज्या आणि मिलेट्स खूपच कमी प्रमाणात असतात. अमेरिकन आहार पद्धतीचे आरोग्यावर अनेक दुष्परिणाम होतात. जास्त कॅलरीज आणि फॅट्स असलेल्या अन्नाच्या सेवनाने अमेरिकेत 'लठ्ठपणा' ही एक राष्ट्रीय समस्या बनलेली आहे.

अमेरिकेतील आईस्क्रीम आणि मिल्कशेक्समध्ये साखरेचं प्रमाण खूप जास्त असतं. अतिप्रमाणात साखर खाल्ल्याने शरीरातील इन्सुलिनची कमतरता निर्माण होऊन टाईप-२ मधुमेह होतो. जंकफूडमधील मिठाच्या अतिवापराने शरीरातील सोडियम वाढल्याने रक्तदाब वाढतो. प्रक्रिया केलेले अन्न सतत खाल्ल्याने मेंदूच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो आणि अनेकजण नैराश्याच्या गर्तेत जातात. आरोग्याच्या गंभीर समस्या उद्भवल्यानंतर अमेरिकेत आरोग्य चळवळी सुरू झाल्या आहेत. अमेरिकन सरकारने 'ईट रिअल फूड' नामक मोहीम राबवली आहे.

नागरिकांनी प्रोसेस्ड फूड खाण्याऐवजी नैसर्गिक प्रथिने, फळे, पालेभाज्या आणि निरोगी फॅट्स खाण्याचा सल्ला दिला जात आहे. अमेरिकन हार्ट असोसिएशनकडून आहारात साखरेचे आणि मिठाचे प्रमाण कमी करण्याबाबत मौलिक मार्गदर्शन केले जात आहे. अमेरिकन फूड हे चवीला उत्तम आणि वेळ वाचवणारे असले तरी त्याचे दीर्घकालीन सेवन आरोग्यासाठी घातक आहे. सेंद्रिय आणि ताज्या अन्नाचा वापर वाढवणे अतिआवश्यक आहे. अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या भारतीयांनी तेथील आहाराच्या आहारी न जाता आपल्या 'स्वदेशी' आरोग्यासाठी उत्तम पदार्थांचे आवर्जून सेवन करावे. अमेरिकेत आता भारतीय आरोग्यदायी अन्नाचे पर्याय बहुतांश भारतीय रेस्टॉरंट आणि ग्रोसरी स्टोअर्समध्ये उपलब्ध आहेत. भारतीय रेस्टॉरंटमध्ये जास्त कॅलरीजचे, तळलेले किंवा बटर-क्रीमयुक्त पदार्थ टाळून संतुलित आहार निवडायला हवा. कमी तेल असलेले दाक्षिणात्य पदार्थ, कोशिंबिरी आणि रायता हे उत्तम पर्याय आहेत. अमेरिकेत स्वतः स्वयंपाक करण्याचा पर्याय विचार करण्याजोगा आहे आणि बहुतांश भारतीयांनी तो स्वीकारलासुद्धा आहे.

गोपालकाला

द्वादशीला काल्याचे भजन, कीर्तन होते किंवा अनंत चतुर्दशीला गोपालकाल्याचा प्रसाद मोठ्या प्रमाणात केला जातो. सगळ्या वस्तू आपल्यात सामावून घेणे हे त्याचे वैशिष्ट्य. म्हणूनच त्याची चव इतर कुठल्याही पदार्थाला येत नाही. पौराणिक कथेनुसार श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांसोबत गायी चरायला नेत असत. तेव्हा दुपारी भोजनास बसल्यावर श्रीकृष्ण सगळ्यांची शिदोरी एका मोठ्या भांड्यात एकत्र करून ढवळून काला करीत. त्यातून प्रेमाचा, समतेचा आणि बंधुभावाचा संदेश देत आणि त्याची चव अप्रतिम होत असे. तेव्हापासून हा प्रघात चालू आहे. वेगवेगळ्या पदार्थांचे मिश्रण करून तयार केलेला हा पदार्थ जेव्हा तयार होतो, तेव्हा विशिष्ट प्रकारचा दरवळ सर्वत्र पसरतो. सगळ्यांनी आपल्या घरून थोडे थोडे जिन्नस आणण्याचा प्रघात आहे. आजकाल चायनीज पदार्थांचे प्रस्थ आहे. म्हणजे २ मिनिट नूडल्स. परंतु, आपले भारतीय पौष्टीक आणि चविष्ट पदार्थदेखील झटपट करू शकतो, तोही इंधनाशिवाय. त्यातलाच गोपालकाला हा पदार्थ आहे. सर्वप्रथम एका मोठ्या भांड्यात एक वाटी भिजवलेले जाड पोहे घ्यावे. त्यात २ वाट्या स्वच्छ धुऊन, रोळून घेतलेल्या ज्वारीच्या लाह्या घालाव्या. त्यात पाव वाटी भिजवलेली हरभरा डाळ घालावी. बारीक चिरलेली काकडी घालावी. त्यात आपल्या आवडीची फळे जसे पेरू, सफरचंद, डाळिंब घालावे. लिंबाचे आणि आंब्याचे लोणचे, थोडं आलं, लिंबू, बारीक चिरलेल्या मिरच्या आणि भरपूर कोथिंबीर घालून मिक्स करावे वरून अर्धा वाटी दही चांगले फेटून त्यात चवीनुसार साखर घालून सर्व मिश्रण व्यवस्थित हलवून घ्यावे. यात मीठ घालू नये असे म्हणतात. हा प्रसाद तयार होत असताना एक अनोखा सुगंध पसरलेला असतो. त्यामुळे प्रसादाची गोडी आणखी वाढते. शेवटी प्रसाद दाखवून सर्वांना वाटल्या जातो आणि गोपालकाला गोड झाला, असे आपसूकच सर्वजण म्हणतात.

● स्नेहल खंडागळे
नागपूर/९९७०१३७९७७

मशीन बंद... अन् म्हशींची एन्ट्री!

देगलूरच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात गवत कापण्याचा अनोखा 'जुगाड'

तभा वृतसेवा
देगलूर, दि. ८ सप्टेंबर -

उद्यानातील गवत वाढले की ते कापण्यासाठी मशीन वापरले जाते. मशीन बंद पडले तर त्याची दुरुस्ती केली जाते किंवा पर्यायी व्यवस्था केली जाते. मात्र, गवत कापण्याचे मशीन बंद असल्याने थेट म्हशीच उद्यानात सोडण्याचा 'देशी जुगाड' करण्यात आल्याचे चित्र देगलूर शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात पाहायला मिळाले.

आज ०८ सप्टेंबर रोजी मंगळवारी सकाळी उद्यानात दोन म्हशी फिरताना दिसून आल्या. नागरिकांच्या दृष्टीने हा प्रकार काहीसा आश्चर्याचा ठरला. या दोन म्हशी उद्यानाला गेट (दरवाजा) असताना उद्यानात नेमक्या कशा आल्या ? या म्हशी कशासाठी आणण्यात आल्या, याची शहानिशा केली असता, उद्यानातील वाढलेले गवत कमी करण्यासाठी त्या सोडण्यात आल्याची माहिती समोर आली.

मशीन बंद, म्हणून 'नैसर्गिक लॉन कटर'!

उद्यानातील गवत कापण्यासाठी असलेले मशीन बंद असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे गवत वाढत गेल्यानंतर ते कमी करण्यासाठी म्हशी उद्यानात सोडण्यास संबंधित प्रशासनातील अधिकाऱ्यांनी परवानगी दिल्याचे एका कर्मचाऱ्याने सांगितले.

म्हशींना गवत मिळाले आणि उद्यानातील

गवतही कमी झाले, असा साधा हिशेब प्रशासनाने केला असावा. मात्र, सार्वजनिक उद्यानाच्या देखभालीसाठी हा उपाय कितपत योग्य आहे? हा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

उद्यान नागरिकांसाठी की जनावरांसाठी?

श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यान हे शहरातील नागरिकांसाठी फिरणे, व्यायाम करणे आणि विरंगुळ्याचे ठिकाण आहे. सकाळ व संध्याकाळ महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक तसेच लहान मुले उद्यानात येत असतात. अशा ठिकाणी मोठी जनावरे सोडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. जनावरांकडून अचानक धावपळ झाली किंवा एखाद्या नागरिकाला इजा झाली, तर त्याची जबाबदारी कोणाची? असा सवालही उपस्थित होत आहे.

गवत कमी झाले; पण प्रश्न वाढले!

म्हशी गवत खात असल्याने उद्यानातील गवत काही प्रमाणात कमी होऊ शकते. मात्र, उद्यानाची देखभाल म्हणजे केवळ गवत कमी करणे नव्हे. नियमित साफसफाई, गवताची शास्त्रशुद्ध छाटणी, झाडांची निगा, स्वच्छता, उद्यानातील साधनांची दुरुस्ती आणि नागरिकांची सुरक्षितता यांचाही त्यात समावेश होतो.

गवत कापण्याचे मशीन बंद असल्यास त्याची तातडीने दुरुस्ती करणे अथवा पर्यायी यंत्रसामग्रीची व्यवस्था करणे अपेक्षित आहे. मात्र, त्याऐवजी जनावरांचा वापर केला जात असेल तर उद्यानाच्या देखभाल व्यवस्थेचे नियोजन आणि प्रशासनाची कार्यपद्धती याबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

छ. शिवरायांच्या नावाच्या उद्यानाला 'म्हशींची ड्युटी' शोभते का?

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने असलेल्या सार्वजनिक उद्यानाची देखभाल अधिक दर्जेदार आणि शिस्तबद्ध असावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. मशीन बंद पडणे ही तांत्रिक अडचण असू शकते; मात्र त्या अडचणीवर म्हशींचा पर्याय शोधणे हा नक्कीच चर्चेचा विषय ठरला आहे.

संबंधित प्रशासनाने या प्रकाराची दखल घेऊन उद्यानातील गवत कापण्यासाठी कायम स्वरूपी व्यवस्था करावी, बंद असलेले मशीन दुरुस्त करावे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उद्यानात मोठी जनावरे सोडण्याबाबत योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कारण गवत कापण्यासाठी मशीन बंद पडणे ही अडचण असू शकते;

पण त्या अडचणीवर म्हशींची 'ड्युटी' लावणे हा उपाय ठरू नये! देगलूरकरांचा थेट सवाल नगरपरिषद प्रशासनाचा थेट सवाल आहे की, उद्यानाला लॉन कटर मशीन हवे की म्हशींची ड्युटी?

'तुमसे ना हो पायेगा' या जनआंदोलनाच्या अनुषंगाने खा. संजय राऊत ११ सप्टेंबर रोजी नांदेडात

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ८ सप्टेंबर -

मराठवाड्यातील विकासाच्या अनुषेशाचा सडेतोड पंचनामा करण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या तुमसे ना हो पायेगा या जनआंदोलनाच्या अनुषंगाने शिवसेना नेते, खासदार संजय राऊत ११ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यावेळी जिल्ह्यातील विकासाच्या बकाल अवस्थेच्या निषेधार्थ खा. संजय राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनआंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी दिली.

येत्या ११ सप्टेंबर रोजी शुक्रवारी सकाळी शिवसेना नेते तथा खासदार संजय राऊत नांदेडमध्ये येणार आहेत. त्यांच्यासोबत शिवसेना नेते, माजी विरोधी पक्षनेते आ.अंबादास दानवे यांच्यासह मराठवाड्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सर्व आमदार उपस्थित असणार आहेत.

नांदेड जिल्ह्यातील व शहरातील घोषित परंतु अपूर्ण असलेल्या विकास कामाच्या पूर्णत्वासाठी शिवसेनेच्या वतीने हजारो नागरिकांच्या उपस्थितीत शुक्रवारी सकाळी १० वाजता नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रचंड धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता शिवसेना नेते तथा खासदार संजय राऊत हे जिल्हाधिकारी नांदेड यांच्यासोबत महत्वपूर्ण बैठक घेवून सविस्तर आढावा घेणार आहेत.

त्यानंतर दुपारी ३ वाजता शिवसेना नेते, खा. संजय राऊत, माजी विरोधी पक्षनेते आ. अंबादास दानवे यांच्यासह शिवसेनेचे सर्व लोकप्रतिनिधी नांदेड जिल्ह्याच्या विविध भागात प्रत्यक्ष भेटी देवून देवून घोषित कामे, मंजूर कामे, अर्धवट, अपुऱ्या व बोगस कामांची पाहणी करणार आहेत. तसेच तेथील नागरिकांशी संवाद साधून अडचणी जाणून घेणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले

या पत्रकार परिषदेला शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, शिवसेना सहसंपर्क प्रमुख दयाल गिरी, युवासेना विभागीय सचिव महेश खेडकर, पुरुषोत्तम धोंडगे, धोंडू पाटील, उपजिल्हाप्रमुख राम चव्हाण, तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम, महानगरप्रमुख मनोज यादव, जिल्हा प्रवक्ता डॉ. बालाजी पेनुरकर, शहरप्रमुख अर्जुन ठाकूर, पिंटू सुनपे, नंदु वैद्य, विजय कल्याणकर आदींची उपस्थिती होती.

गणेश उत्सवानिमित्त मरखेल पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक

तभा वृतसेवा
हाणेगाव, दि. ८ सप्टेंबर -

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मरखेल पोलीस ठाण्याच्या वतीने शांतता समितीची बैठक उत्साहपूर्ण व शांततामय वातावरणात संपन्न झाली.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मरखेल नगरीचे सरपंच गवाले,शांताराम पाटील पळणिटकर, योगेश देशमुख,हज्जु चमकुडे,गफ्फार भाई,शिवराज पाटील,संतोष पाटील,बालाजी चोपडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्तावीक मरखेल ठाण्याचे प्रमुख रविंद्र हुंडेकर यांनी केले यावेळी गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच सर्व समाजबांधवांनी परस्पर सामंजस्याने सण साजरा करावा, याबाबत बैठकीत मार्गदर्शन केले. तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपविभागीय पोलिस अधिकारी किरण पोपळघट यांनी यावेळी गणेशोत्सव आनंदाने, उत्साहाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरा करा, सण डीजेमुक्त साजरे करून ध्वनिप्रदूषण टाळावे असे आवाहन केले व गणेश मंडळांनी प्रशासनाने दिलेल्या नियमांचे पालन करावे, मिरवणुकीदरम्यान शिस्त राखावी तसेच कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास न ठेवता शांतता व बंधुभाव कायम ठेवावा, असे आवाहन करण्यात आले. बैठकीस पोलीस अधिकारी, कर्मचारी, शांतता समितीचे सदस्य, गणेश मंडळांचे पदाधिकारी, ग्रामस्थ व विविध समाजातील मान्यवर,पत्रकार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मच्छिंद्र गवाले यांनी केले तर आभारप्रदर्शन मरखेल ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक विलास पवार यांनी आभार प्रसंगी आगामी गणेशोत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी केले.

कु. शितल दुधंबेची मुंबई महापालिकेत माध्यमिक शिक्षकपदी नियुक्ती

मुदखेड -मुदखेड येथील महात्मा गांधी विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. शितल दुधंबे हिची मुंबई महापालिकेत माध्यमिक शिक्षकपदी नियुक्ती झाली असून, तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. अत्यंत प्रतिकूल व हलाखीच्या आर्थिक परिस्थितीत शिक्षणाची वाट न सोडता जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या बळावर तिने हे यश संपादन केले आहे. कु. शितल दुधंबे हिला बालपणापासूनच वाचनाची प्रचंड आवड होती. मात्र, घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने शिक्षण घेत असतानाच तिला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तिला आईसोबत इतरांच्या घरकामात मदत करून आर्थिक जबाबदारीत हातभार लावावा लागत होता. अशा परिस्थितीतही तिने शिक्षणाची कास कधीही सोडली नाही आणि आपल्या ध्येयाचा सातत्याने पाठपुरावा केला. अनेक आर्थिक व सामाजिक अडचणींवर मात करत शितलने आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. तिने एम.ए. (मराठी), एम.ए. (इतिहास), बी.एड. आणि एम.एड. या पदव्या संपादन केल्या आहेत. तसेच तिने सेट आणि यूजीसी नेट या महत्त्वाच्या परीक्षाही उत्तीर्ण केल्या आहेत. विशेष म्हणजे, सध्या ती मराठी विषयामध्ये पीएच.डी.चे संशोधनकार्य करीत आहे. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची कास न सोडता सातत्यपूर्ण प्रयत्न, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर उच्च शिक्षण पूर्ण करून मुंबई महापालिकेत माध्यमिक शिक्षकपदी नियुक्ती मिळविल्याने शितल दुधंबे हिचे विशेष कौतुक होत आहे. तिचा हा संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवास ग्रामीण भागातील तसेच प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरत आहे. तिच्या या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक बाविस्कर सर तसेच तिच्या दहावीच्या वर्गशिक्षिका जोरगुलवार मॅडम, सोनटक्के मॅडम यांच्यासह राजे सर, गाढे सर, नागरगोजे सर, देशमुख सर, कोम्पले सर, बुन्नावार सर, नन्नवरे सर आणि इतर शिक्षकांनी तिच्या शैक्षणिक यशाबद्दल तसेच उच्च शैक्षणिक पदव्या संपादन केल्याबद्दल अभिनंदन केले. शितल दुधंबे हिने आपल्या जिद्दीच्या, चिकाटीच्या आणि परिश्रमाच्या बळावर मिळविलेले हे यश निश्चितच अभिमानास्पद असून, तिच्या पुढील शैक्षणिक, संशोधन व अध्यापन क्षेत्रातील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

श्री सुभाष शुगर, शिऊर साखर कारखान्याच्या वतीने ऊस रोपवाटिका प्रशिक्षण शिबिरासाठी शेतकरी बांधवांची पुणे येथे रवानगी

तभा वृतसेवा
हदगाव, दि. ८ सप्टेंबर -

श्री सुभाष शुगर प्रा. लि.हडसनी व शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी या दोन्ही कारखान्याच्या वतीने दि.७ सप्टेंबर २०२६ रोजी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे येथे तीन दिवसीय ऊस रोपवाटिका प्रशिक्षण शिबिराकरिता दोन्ही कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ३१ ऊस उत्पादक शेतकरी बांधवांची रवानगी करण्यात आली आहे.

हदगाव - हिमायतनगर सह उमरखेड, कळमनुरी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना चांगले निरोगी व उत्कृष्ट रोपे मिळावीत त्याचबरोबर ऊस रोपवाटिका उभारणीतून आर्थिक स्थैर्य व लागवड खर्च कमी करून जास्तीत जास्त ऊस उत्पादन मिळावे याकरिता ऊस रोप लागवड करणे काळाची गरज आहे. आपल्या भागात रोपवाटिका नसल्यामुळे लांब अंतरावरून रोपे आणावी लागतात त्यामुळे रोपाची किमतीत वाढ होऊन लागवडीचा खर्च वाढतो यावर उपाय म्हणून दोन्ही कारखान्याच्या वतीने व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे यांच्या सहयोगाने तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिरास ३१ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस रोपवाटिका

तंत्रज्ञान मिळविण्याकरिता रवाना केले आहे. आपल्या भागात ऊस रोपवाटिका उभारणी बरोबरच कार्यक्षेत्रातील बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळणार आहे तसेच उच्च प्रतीचे व कमी खर्चात रोपे उपलब्ध होणार आहेत असे कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख व कार्यकारी संचालक सुशील कुमार देशमुख यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

शेतकरी बांधवांना प्रशिक्षण शिबिराचा लाभ होणार : सुशीलकुमार देशमुख

ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचा लागवड खर्च कमी करण्यावर आमचे विशेष लक्ष असून त्याच निमित्ताने वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे यांच्या विशेष सहकार्याने हे तीन दिवसीय ऊस रोपवाटिका प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यात ऊस रोपवाटिका तंत्रज्ञान आत्मसात करून चांगले व निरोगी रोपे तयार होण्यास हातभार लागेल त्यामुळे लागवड खर्च कमी होऊन जास्तीत जास्त उत्पादन शेतकरी बांधवांना मिळणार असल्याचे मत कार्यकारी संचालक सुशील कुमार देशमुख यांनी व्यक्त केले.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी तहसीलदारांना निवेदन

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ८ सप्टेंबर -

धनगर समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समावेश करून आरक्षणाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, या मागणीसाठी मुदखेड तालुका सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने आज, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी तहसीलदार, मुदखेड यांना निवेदन देण्यात आले. तहसील प्रशासनामार्फत हे निवेदन शासनाकडे पाठविण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धनगर समाजाला एसटी प्रवर्गातील आरक्षणाबाबत यापूर्वी आश्वासन दिले होते. सत्तेत आल्यानंतर पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत धनगर समाजाच्या एसटी आरक्षणासंदर्भात निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आल्याचा दावा समाज बांधवांनी निवेदनातून केला आहे. मात्र, अद्याप या मागणीची अंमलबजावणी झालेली नसल्याने शासनाने धनगर समाजाला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी, अशी मागणी करण्यात आली.

या कार्यक्रमास मुदखेड शहराचे माजी उपनगराध्यक्ष तथा सैनिक फेडरेशन मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मण देवदे, यशवंत सेना मुदखेड तालुका अध्यक्ष गोविंद बने, नगरसेवक उपेंद्र देवदे, धनगर समाज मुदखेड तालुका अध्यक्ष नितीन माने, भारतीय जनता पार्टी युवा अध्यक्ष गजानन कमळे, तसेच वामन गुंठे, बालाजी वड्डे, जळबाजी कमजळे, चिंगु संभोड, कार्तिक वडे, कृष्णा शिरगिरे, व्यंकटी शिगणे, नवनाथ घारगे, बालाजी पैंदे, परमेश्वर चारले, तुळशीराम कुडवे, दिगंबर बुचडे, भगवानराव पानेवार यांच्यासह मुदखेड तालुक्यातील ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने धनगर समाज बांधव उपस्थित होते.

मांजरा, रेणा व तेरणा बॅरेजेसच्या निविदेत सावळा गोंधळ

तभा वृतसेवा
नांदेड, दि. ८ सप्टेंबर -

लातूर व धाराशिव जिल्ह्यातील मांजरा, रेणा व तेरणा नदीवरील अनेक वर्षापासून दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असलेले बॅरेज दुरुस्तीच्या कामांना अखेर शासनस्तरावरून मान्यता मिळाली आहे. या कामांची निविदा प्रक्रिया मुख्य व्दार उभारणी पथक छत्रपती संभाजीनगर व यांत्रिकी विभाग धाराशिव या जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी विभागांकडून प्रगतीपथावर असल्याची खात्रीलायक माहीती प्राप्त झाली असून या सर्व कामांवर यांत्रिकी मंडळ, नांदेड या कार्यलयाचे तांत्रिक नियंत्रण राहणार आहे. परंतू या कामच्या निविदेत सावळा गोंधळ झाल्याची चर्चा सुरु आहे.

निविदेसंदर्भात माहिती घेतली असता अनेक धक्कादायक खुलासे प्राप्त होत आहेत. संबंधीत अभियंत्यांनी मर्जीतील गुत्तेदारांची मर्जी संभाळण्याची पुर्ण जबाबदारी घेतल्याचे निविदामधील पी. क्यु. (पोस्ट क्वॉलीफिकेशन) वरून सिध्द होत आहे.

निविदा भरणाऱ्या गुत्तेदारास कामातील महत्वाच्या बाबीचा पूर्व अनुभव परिमाणाच्या ३० टक्के असावा असे शासन निर्णय दि. ०५/०७/२०१८ च्या पश्चात अर्हता निकषात स्पष्ट दिले आहे. उदाहरणार्थ खुलगापूर बॅरेजची गेट साईज १२४७ मी व संख्या १० असल्यास शासन आदेशातील मार्गदर्शक सूचनांनुसार कंत्राटदारास समकक्ष म्हणजेच किमान १२ मी ७ मी गेट साईज व ३० टक्के संख्या म्हणजे किमान ३ गेटचा अनुभव असणे आवश्यक असतांना निविदेमध्ये कंत्राटरास ८.५ मी ५ मी गेट साईज व संख्या ३ असा अनुभव मागविण्यात आला आहे ते तर्कहीन असून हि गंभीर अनियमितता आहे. परंतु याचा अर्थ निविदेमध्ये दर्शविलेल्या निकषामध्ये या शासन निर्णयास केराची टोपली दाखविली असल्याने मर्जीतील ठराविक गुत्तेदारांना कोणत्याही परस्थितीत पात्र करण्याच्या दृष्टीने अभियंता वर्गाचा आटापिटा सुरु असल्याचे दिसून येत आहे.

शासन निर्णयाप्रमाणे मर्जीतील गुत्तेदारांकडे ठराविक कामांचा अनुभव नसल्या कारणाने निविदेतील पाश्चात अर्हता निकषच बदलले असावेत अशी जोरदार चर्चा यांत्रिकी विभागांमध्ये सुरु आहे.

त्यामुळे या संपुर्ण प्रकारची शासनाने वेळीच दखल घेवून निविदेमध्ये शासन निर्णया पमाणे निकष ठेवून नव्याने निविदा मागवण्यात याव्यात व या संपुर्ण अनियमिततेची सखोल चौकशी करून हा प्रकार थांबवावा अशी मागणी होत आहे.

हिमायतनगर मध्ये कावड यात्रा दाखल

तभा वृतसेवा
हिमायतनगर, दि. ८ सप्टेंबर -

सहस्त्रकुंड (इस्लापूर) ते हिमायतनगर असा सुमारे २० किलोमीटर पायी प्रवास करीत असंख्य बजरंगींच्या उपस्थितीत भव्य कावड यात्रा भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात सोमवार दि. ७हिमायतनगर येथे दाखल झाली. यावेळी जय श्रीरामच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला असून शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

ही कावड यात्रा सुरू होण्याअगोदर सहस्त्रकुंड येथील महादेवाला कुंडातील पाण्याने अभिषेक करुन महाआरती करण्यात आली. यानंतर ही

कावड यात्रा हिमायतनगरच्या दिशेने ही कावड यात्रा रवाना झाली. शेकडो बजरंगी आणि युवकांनी कावड खांद्यावर घेवून जय श्रीराम, हर हर महादेवचा गजर केला.

हिमायतनगर शहरात कावड यात्रेचे आगमन झाल्यानंतर सहस्त्रकुंड येथून आणलेल्या पवित्र जलाने येथील महादेव मंदिरातील महादेवाचा जलाभिषेक करण्यात आला.

गेल्या २० वर्षापासूनची अखंडित परंपरा बजरंग दल, विश्व हिंदू परिषद तसेच सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने मागील २० वर्षांपासून ही धार्मिक परंपरा अखंडपणे जोपासली जात आहे. या वर्षीही या भव्य कावड यात्रेतही मोठ्या संख्येने नवतरुण, बजरंगी कार्यकर्ते, भाविक व ग्रामस्थ सहभागी झाले होते.

श्रद्धा, भक्ती आणि धार्मिक परंपरेचा सुंदर संगम या कावड यात्रेत पाहायला मिळाला. यानंतर हिमायनगर येथील श्री परमेश्वर मंदिर ट्रस्टच्या वतीने कावड यात्रेतील सर्व सहभागी युवकांना टी शर्टचे वाटप करण्यात आले. अतिशय भक्तीमय वातावरणात या कावड यात्रेची येथील परमेश्वर मंदिरात सांगता झाली.

कंधार तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा : परमेश्वर जाधव

तभा वृतसेवा
कंधार, दि. ८ सप्टेंबर -

कंधार तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात यावा. कोणतेही निकष न लावता शेतकऱ्यांना सरसकट प्राथमिक स्वरूपात तात्काळ हेक्टरी ५० हजारांची मदत देण्यात यावी, तसेच पीक विमा मंजूर करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने कंधारच्या तहसीलदारांकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

२०२६ च्या खरिप हंगामात समाधानकारक पाऊस झाला नाही. पेरणी करताना पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना दुबार परणीचा सामना करावा लागला. गेल्या १५ ते २० दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकऱ्यांच्या

हाताला आलेले सोयाबीन, कापूस, हाळद व इतर पिके वाळून जात आहेत. यामुळे शेतकरी आस्मानी संकटात सापडला असून सरकार, मंत्री, आमदार दहिहांडीच्या नावाखाली अश्लील नृत्याचे कार्यक्रम ठेऊन व डीजेचे राजकारण करण्यात व्यस्त आहेत.

१ जून ते आजपर्यंत जिल्ह्यात सरासरी ५२०.९० मिलिमीटर पाऊस झाला आहे. मागील वर्षी याच कालावधीत ८२६.२० मिलिमीटर पाऊस झाला होता. सध्या जिल्ह्यात १६ तालुक्यांवर कोरड्या दुष्काळाचे सावट आहे. मात्र, सर्व तालुक्यांच्या तुलनेत कंधार ९५.४, लोहा ८३.३, देगलुर ७७.५ आणि मुखेड ५१.३ मिलिमीटर पावसाची तूट झाली आहे. कंधार तालुक्यात सरासरी पेक्षा ९५.४ पावसाची तूट आहे. त्यामुळे कंधार तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात यावा. कोणतेही निकष न लावता सरसकट शेतकऱ्यांना प्राथमिक स्वरुपात तात्काळ हेक्टरी ५० हजारांची मदत देण्यात यावी. तसेच पीक विमा मंजूर करण्यात यावा. अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल व मंत्री व लोकप्रतिनिधीना कंधार तालुक्यात फिरु देणार नाही, असा इशारा शिवसेनेने कंधारच्या तहसीलदारांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनावर शिवसेनेचे तालुकाप्रमुख परमेश्वर पाटील जाधव, शिवसेनेचे लोहा-कंधार विधानसभा संघटक गणेश कुंटेवार, शिवसेना शहरप्रमुख अतुल पापीनवार, शिवसेनेचे तालुका संघटक पंडित देवकांबळे, कुरुळा सर्कलप्रमुख जि.एम. पवळे, राजू डफडे, एस.डी.बोटेवाड, अशोक तेलंग आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या निवेदनाच्या प्रति राज्याचे मुख्यमंत्री, शिवसेना नेते आंबादास दानवे, छत्रपती संभाजीनगरचेन विभागीय आयुक्त, नांदेडचे जिल्हाधिकारी, कंधारचे उपविभागीय अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहेत.